रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक १६६
www.ramprahar.com

मंगळवार, २ जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग

नववर्ष भेट : सुकन्या योजना, एफडीवरील व्याजदरात वाढ/२

पर्यटकांकडून जलप्रवासाला पसंती; परतीचे नियोजन/५

महिला कबड्डी स्पर्धेत किहीम संघ विजेता/८

## नमो ॲपवर जन-मन सर्वेक्षण; पंतप्रधानांनी मागितला फीडबॅक



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नमो ॲपवर जन-मन सर्वेक्षण सुरू केले आहे, ज्याद्वारे त्यांना १० वर्षांच्या कार्यकाळातील प्रगती जाणून घ्यायची आहे. नमो ॲपवर जनमनसर्व्हेच्या माध्यमातून तुमचा फीडबॅक थेट माझ्याशी शेअर करा, असे आवाहन पंतप्रधानांनी सोशल मीडियाद्वारे केले आहे. लवकरच लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सत्तेची हॅट्ट्रिक करण्याच्या तयारीत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी भाजप सरकारने गेल्या १० वर्षांत देशातील विविध क्षेत्रांत केलेल्या कामाबाबत जनतेकडून प्रतिक्रिया मागवल्या आहेत. पीएम मोदींनी त्यांच्या सोशल मीडिया साइट एक्सवर या संदर्भात पोस्ट शेअर केली आहे.

### माजी आमदार सुरेश लाड समर्थकांच्या हाती 'कमळ'

# भाजप कार्यकर्त्यांचा सन्मान करणारा पक्ष

### मंत्री रवींद्र चव्हाण यांचे कर्जतमध्ये प्रतिपादन



(छाया : संकेत भोईर)

**कर्जत : विजय मांडे**

भारतीय जनता पक्ष जनसामान्यांचा पक्ष आहे. कार्यकर्त्यांचा सन्मान ठेवणारा हा पक्ष असून तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. महाराष्ट्राला सर्वच बाबतीत अव्वल ठिकाणी नेण्यासाठी तुम्ही खंबीरपणे पाठीशी उभे रहा, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि.१) येथे केले.

माजी आमदार सुरेश लाड समर्थक राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्या वेळी ते बोलत होते. शेळके मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास व्यासपीठावर भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार सुरेश लाड, धैर्यशील पाटील, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, चिटणीस रमेश मुंढे, उपाध्यक्ष वसंत भोईर, कर्जत तालुकाध्यक्ष राजेश भगत, शहराध्यक्ष विजय जिनगरे, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, माथेरान अध्यक्ष प्रवीण सकपाळ, खोपोली शहराध्यक्ष रमेश रेठरेकर, किसान सेलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, जि.प.चे माजी सभापती नरेश पाटील, माजी पं.स. सभापती तानाजी चव्हाण, माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, नितीन कांदळगावकर, रणजीत जैन, सागर शेळके, शर्वरी कांबळे आदी उपस्थित होते.

मंत्री रवींद्र चव्हाण आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, कार्यकर्ता कोणत्याही पक्षाचा असला तरी तो जनसामान्यांसाठी काम करीत असतो. सुरेश लाड यांनी कोणताही कार्यकर्ता दुखावला जाणार नाही याची काळजी घेतली. त्यांच्याबरोबर आम्ही बैठक घेतली असता त्यांनी स्वार्थासाठी येणे मला पटत नाही. सर्व सहकाऱ्यांना विचारात घेऊन मी निर्णय घेईन, असे सांगितले. राजकारणात असा विचार करणारे फार थोडे आहेत. असे सात्विक नेतृत्व आम्ही पाहिले नाही. आज परिवार म्हणून तुम्ही सर्वजण भाजपमध्ये दाखल झाला आहेत. तुमच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. (पान २ वर..)

> **अजूनही मतदारसंघात खूप विकासकामे करायची आहेत. खालापूरमधील औद्योगिकरण आणि त्यापासूनच्या समस्या आहेत. नदी शुद्धीकरणाची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे पुढल्या काळात मतदारसंघात पक्ष बळकटीसाठी प्रयत्न करेन. खासदार, आमदार, नगर परिषदा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आपल्या विचारांच्या पक्षाच्या आल्या, तर आपण जिल्ह्यात एक नंबरचा पक्ष होऊ.**
> **-सुरेश लाड, माजी आमदार**

### मोदी सरकारच्या योजना लोकोपयोगी -आमदार प्रशांत ठाकूर

*पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पद्धतीने काम करीत आहेत, ते सर्वांना भावले आहे. त्यांनी अनेक योजना गोरगरीब व सर्वसामान्यांसाठी आणल्या आहेत. यापूर्वीही अनेक योजना आल्या आणि त्या कधी गेल्या ते समजले नाही, पण मोदी सरकारच्या योजना जनतेचे भले करणाऱ्या व त्यांच्यापर्यंत पोहचणाऱ्या आहेत, असे सांगून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, सुरेश लाड एक विश्वासू लोकप्रतिनिधी आहेत. त्यांनी स्वतःसाठी नाही, तर लोकांसाठी काम केले आहे. पुढे बोलताना त्यांनी मुंबई आपल्याला जवळ आणण्यासाठी शिवडी-न्हावा २३ किमीचा रस्ता समुद्रातून केला आहे. त्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारी रोजी होणार आहेत. त्यासाठी आपण सर्वांनी या, असे निमंत्रण दिले.*

# ट्रकचालकांच्या संपाला नवी मुंबईत हिंसक वळण

## पोलिसांना मारहाण; ४० ते ५० जण ताब्यात



**नवी मुंबई : बातमीदार**

मोटार वाहन कायद्यास विरोध दर्शवित ट्रकचालक संपावर गेले आहेत. नवी मुंबईतही ट्रकचालकांनी सोमवारी (दि.१) रास्ता रोको केला. या वेळी ट्रकचालकांनी पोलिसांवर हल्ला केला. या प्रकरणी ४० ते ५० ट्रकचालकांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

केंद्र सरकारच्या माध्यमातून मोटार वाहन कायदा पारित केला गेला आहे. या कायद्यानुसार अपघातास जबाबदार ट्रकचालकास सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. सोबतच दंडदेखील आकाराला जाणार आहे. (पान २ वर..)

> कोणतीही परवानगी न घेता थेट महामार्ग अडविणे कायद्याने गुन्हा आहे. तरीही आम्ही त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. आपण संबधित विभागाला लेखी निवेदन द्यावे यातून मार्ग निघेल, पण आंदोलन थांबवावे, अशी विनंती करूनही त्यांनी आंदोलन केले. त्यामुळे आम्ही त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी आमच्या पोलिसांवरच हल्ला केला. त्यामुळे यात जे कुणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई होणार.
> **-विवेक पानसरे,** उपायुक्त, नवी मुंबई पोलीस परिमंडळ १



**पनवेल : अस्मिता कला, क्रीडा व सांस्कृतिक मित्र मंडळ आणि प्रियदर्शनी महिला मंडळ नवीन पनवेलच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी मंडळाच्या प्रमुख सुशिला घरत, जगदिश घरत, ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, प्रभाग १७चे अध्यक्ष विजय म्हात्रे, संदीप पाटील, किसन गायकर, सोमेश्वर स्वामी, प्रशांत आवळे, शिवनाथ पन्हाळे, हरी भिसे, शिवाजी त्रिभुवन, प्रफुल्ल पवार, दिपेश पाटील, हनुमान मिसाळ आदी उपस्थित होते.**

## निवडक

### नववर्षाची पार्टी करून येताना सहा मित्रांचा अपघाती मृत्यू

**जमशेदपूर :** झारखंडच्या जमशेदपूर येथून नववर्षाची पार्टी करून घरी परतणाऱ्या आठ मित्रांच्या गाडीला भीषण अपघात झाला. या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू आणि दोघे जखमी झाले आहेत. अतिवेगात चाललेली गाडी आधी रस्त्याच्या दुभाजकाला आणि त्यानंतर पुढे जाऊन झाडावर आदळून उलटली. जमशेदपूरमधील बिष्टूपूर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रातील सर्किट हाऊस परिसरात हा अपघात झाला. मृत युवक कुलुप्तांगा भागातील रहिवासी असल्याचे सांगितले जाते.

### नववर्षाच्या प्रारंभीच जपानमध्ये भूकंप; त्सुनामीचाही इशारा

**टोकियो :** नववर्षाच्या सुरुवातीलाच जपान भूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरले. पश्चिम जपानमध्ये इशिकावा आणि जवळच्या परिसरात आलेल्या भूकंपाची तीव्रता ७.४ मॅग्निट्युटएवढी नोंदवली गेली आहे. या भूकंपानंतर त्सुनामी येण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदाच्या हॅट्ट्रिकमध्ये मुस्लिम बांधवांच्या मतांचा सिंहाचा वाटा असेल

### अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांचे प्रतिपादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी लोकसभा निवडणुकीत विजयाचा दृढ संकल्प भारतीय जनता पक्षाने केलेला आहे. याच विजय संकल्पाच्या अनुषंगाने पनवेलच्या भाजप मध्यवर्ती कार्यालयात अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीत कोकण, ठाणे आणि मुंबई विभागातील लोकसभा मतदारसंघांच्या संयोजकांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच झाली. या वेळी बोलताना मुलतानी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विजयी हॅट्ट्रिकमध्ये मुस्लिम बांधवांच्या मतांचा सिंहाचा वाटा असेल, असे प्रतिपादन केले.

अल्पसंख्याक समाजातील अन्य धर्मीय भाजपच्या पाठीशी असले तरीदेखील मुस्लिम समाज अजून म्हणावा तसा मते देत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी ज्या मुस्लिमबहुल बूथवर भाजपला मतदान होत नाही असे बूथ अधोरेखित करून तिथे संशोधन करण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी मुस्लिम समाजाकरिता आखलेल्या योजनांची या बूथमधील शेवटच्या व्यक्तीपर्यंत माहिती करून द्यावी लागेल. या योजनांच्या निकषांमध्ये जास्तीत जास्त लाभार्थी बसवून जात, धर्म, पंथ न पाळता लोकाभिमुख राजकारण करणाऱ्या भाजपची छबी जनमानसात घेऊन जावी लागेल, असे सांगून प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी म्हणाले की, २०२४मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विजयाची हॅट्ट्रिक करणार आहेत. त्यांच्या विजयात मुस्लिम समाजाची विशेषत्वाने जाणवतील अशी लाक्षणिक मते आपल्याला मिळवून द्यायची आहेत. यासाठी ब्ल्यू प्रिंट तयार केली आहे.

या वेळी मुलतानी यांनी तब्बल तीन तासांहून अधिक काळ संयोजकांसोबत चर्चा करीत स्ट्रॅटेजी यशस्वी बनविण्याचे नियोजन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मुस्लिम समाजातील बांधवांना एका हाती कुराण, तर दुसऱ्या हाती कॉम्प्युटर हा विकासाचा मंत्र दिला असून तो घराघरात पोहचवण्यासाठी आपण सारे कंबर कसूयात, असे आवाहनही केले.

भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत आणि शहराध्यक्ष अनिल भगत यांनी इद्रिस मुलतानी आणि उपस्थित संयोजक महोदयांचे स्वागत करून आढावा बैठकीसाठी शुभेच्छा दिल्या. या बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मावळ लोकसभा मतदारसंघाचे संयोजक सय्यद अकबर व टीमने अथक परिश्रम घेतले. (पान २ वर..)

# गौतमी पाटीलच्या नृत्याविष्काराला मुरूडकरांची दाद





(छाया : सुधीर नाझरे)



**मुरूड : प्रतिनिधी**

**मुरूड पर्यटन महोत्सवात रविवारी (दि.३१) शेवटच्या रात्री प्रसिद्ध लावणी कलाकार गौतमी पाटील हिच्या नृत्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजकांनी अतिशय सुंदर नियोजन केल्याने व पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवल्याने कोणताही अनुचित प्रकार न घडता कार्यक्रम पार पडला.**

नृत्यांगना गौतमी पाटील तरुणांच्या गळ्यातील ताईत बनली आहे. तरुणच कशाला सर्व वयोगटातील लोक गौतमीच्या नृत्याचे दिवाणे आहेत. त्यामुळे तिच्या कार्यक्रमाला मुरूडमध्येही चाहत्यांची मोठी गर्दी उसळली होती.

या पार्श्वभूमीवर स्पेशल पोलिसांची फौज तैनात असल्याने सुमारे २० ते २५ हजार दर्शक असूनही कोणताही गैरप्रकार घडला नाही. पर्यटकांनीदेखील गौतमीच्या डान्सचा भरपूर आनंद घेतला आणि मनमुराद दाद दिली.

दरम्यान, आमदार महेंद्र दळवी यांनी गौतमीचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या वेळी मंचावर मुरूड महोत्सवाच्या अध्यक्ष कल्पना पाटील, संदीप पाटील, वीरेंद्र भगत, प्रकाश सरपाटील आदी उपस्थित होते.

### शालेय विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण

**अहमदनगर : प्रतिनिधी**

अहमदनगरमध्ये शालेय विद्यार्थ्यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यामुळे वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्यात चिंता व्यक्त होत आहे. दरम्यान, यानंतर आरोग्य यंत्रणा अलर्ट झाली आहे.

अहमदनगर तालुक्यातील दोन विद्यार्थी कोरोनाबाधित आढळले आहेत. सर्दी-खोकला असल्याने तीन दिवसांपूर्वी या विद्यार्थ्यांची रॅपिड अँटीजेन चाचणी करण्यात आली होती. यात विद्यार्थी कोरोनाबाधित आढळले आहेत. दिलासादायक बाब म्हणजे या विद्यार्थ्यांमध्ये सौम्य लक्षणे असल्याने कोणताही धोका नाही.

दरम्यान, राज्यात कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, पण त्याची तीव्रता पूर्वीसारखी नसल्याचे चिंतेचे वातावरण दिसत नाही.

# माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते विचुंबेत जिमचे उद्घाटन



(छाया : अक्षय शार्दुल)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलजवळील विचुंबे येथे महेश भिंगारकर यांनी नव्याने एम.बी.फिटनेस ही जिम सुरू केली आहे. या जिमचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि.३१) करण्यात आले.

उद्घाटन समारंभास विचुंबेचे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, माजी सरपंच बळीराम पाटील, अमिता म्हात्रे, माजी उपसरपंच किशोर सुरते, रवींद्र भोईर, अप्पा गायकवाड, डी. के.भोईर, अनिल भोईर, बाबुराव भिंगारकर, प्रेम भिंगारकर, भरत पाटील, अक्षता गायकवाड, विभुती सुरते, नविता भोईर, प्रगती गोंधळी, श्रावणी भोईर, भाग्यश्री भोईर, भावना भोईर, संजिता भिंगारकर, ज्योती भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी, महेश पाटील यांच्या फिटनेसबाबतच्या ज्ञानामुळे तरुणांना चांगल्या प्रकारची शिस्त आणि शारीरिक कसरतीची आवड निर्माण होईल, असे गौरोद्गार काढून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# नववर्षात सरकारची भेट! सुकन्या योजना आणि एफडीवरील व्याजदरात वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नवीन वर्षात आर्थिक गुंतवणूक करण्याच्या विचारात असलेल्या लोकांसाठी आनंदाची बातमी आहे. नवीन वर्षात सरकाकडून खूशखबर मिळाली आहे. सरकारने सुकन्या समृद्धी योजना आणि मुदत ठेव (एफडी) योजनेवरील व्याजदरात वाढ करीत मोठी भेट दिली आहे.

अर्थ मंत्रालयाने चालू आर्थिक वर्षातील चौथ्या तिमाही जानेवारी-मार्चसाठी सुकन्या योजना आणि मुदत ठेव योजनेतील व्याज दरात वाढ करत सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. सुकन्या समृद्धी योजनेवरील व्याजदरात ०.२० टक्के आणि एफडीवरील व्याजदरात ०.१० टक्के वाढ करण्याची घोषणा सरकारने केली आहे.




याशिवाय इतर सर्व छोट्या योजनांचे दर पूर्वीप्रमाणेच कायम राहतील, अशीही माहिती अर्थ मंत्रालयाने दिली. केंद्रीय वित्त मंत्रालयाने शुक्रवारी सांगितले की, सुकन्या समृद्धी योजना आणि तीन वर्षांच्या मुदत ठेवींसाठी किरकोळ वाढीसह बहुतेक योजनांमधील व्याजदर समान पातळीवर आहेत.

सुकन्या योजनेचा व्याजदर ८.२ टक्के करण्यात आला आहे, तर या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीसाठी मुदत ठेवीचा दर ७.१ टक्के असेल. याआधी सुकन्या समृद्धी योजना आणि तीन वर्षांच्या कालावधीसह टीडी अनुक्रमे ८.० टक्के आणि ७.१ टक्के होते.

### पीपीएफ दर जैसे थे!

जनरल प्रॉव्हिडंट फंड म्हणजेच पीपीएफच्या दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.




पीपीएफचे दर एप्रिल-जून २०२०मध्ये बदलले होते. त्यानंतर दर कायम आहेत. एप्रिल-जून २०२०मध्ये हा दर ७.१ टक्क्यांवरून ७.९ टक्के करण्यात आले होते. भारतीय रिझर्व्ह बँकेने मे २०२२पासून पॉलिसी रेटमध्ये २.५ टक्क्यांनी वाढ केली होती. त्यानंतर बँकांनाही जमा केलेल्या पैशांवर व्याज वाढवावे लागले.

# इर्शाळवाडी दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाला आला वेग

## तीन गुंठे जमिनीवर घर; मे २०२४पर्यंत गाव वसणार

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीतील दरडग्रस्तांच्या कायमस्वरूपी पुनर्वसनाच्या कामाला आता वेग आला आहे. चौकमधील मानिवली येथे अडीच हेक्टर जागेत ४४ घरे बांधण्याचे काम वेगाने सुरू आहे. आपद्ग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी तीन गुंठे जागेवर सिडकोच्या माध्यमातून ही घरे बांधून दिली जाणार आहेत.

यासाठी प्री कास्ट तंत्रज्ञान वापरले जात असल्याने हे काम कमी वेळात होणार आहे. त्यामुळे नववर्षात इर्शाळवाडी गाव हे मे अखेरपर्यंत वसले जाणार आहे. गावात शाळा, समाजमंदिर, खेळाचे मैदान या सुविधाही पुरवल्या जाणार आहेत. अंतर्गत रस्ते, पाणी आणि वीज आदी सुविधाही पुरवण्यात येणार आहेत.

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी या आदिवासीवाडीवर १९ जुलैच्या रात्री दरड कोसळली. या दुर्घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला तर ८४ जणांचा शोध लागला नसल्याने त्यांना शासनाने मृत घोषित केले आहे. तेथील परिस्थिती पाहता या कुटुंबांचे स्थलांतर करणे गरजेचे होते.

युती सरकारने इर्शाळवाडीचे पुनर्वसन करण्यासाठी तातडीने पावले उचलली गेल्याने नववर्षाच्या मध्यान्ह्यात बाधित दरडग्रस्त हे आपल्या नव्या घरात प्रवेश करणार आहेत.

> **येथे पाच एकर जागेमध्ये ४४ घरे उभारली जात आहेत. हॉल, किचन, बेडरूम, स्वच्छतागृह आणि मोकळी जागा अशी घरांची रचना असेल. घरे कॉंक्रिटची असतील. छप्पर स्लॅबचे असेल. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी स्वतंत्र नाला असेल, ज्यामुळे घरांना धोका होणार नाही. याशिवाय इतर नागरी सुविधांचादेखील यात समावेश आहे. सहा महिन्यांत या घरांचे काम पूर्ण होईल.**
>
> **-उत्तम नागटिळक, प्रकल्प व्यवस्थापक**

# खालापुरात वणव्यामुळे दोन ठिकाणी आग

## जीवितहानी नाही; सामानाचे नुकसान

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुरातील हाळ खुर्द गावाजवळ मुंबई-पुणे जुन्या महामार्गालगत दर्गा परिसरात असणाऱ्या वणवा लागला असता, या वणव्याची आग फार्महाऊसमधील गवताला लागली व आगीने रौद्ररूप धारण केले. यामध्ये घरातील सामान व फर्निचरसह घर जळून खाक झाले. एक तास धगधगत असलेल्या आगीवर खोपोली अग्निशमन दलाच्या जवानांनी नियंत्रण मिळवले व आग आटोक्यात आली, मात्र कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही.

दुसऱ्या घटनेत इसांबा गावाच्या हद्दीत बंद असणाऱ्या डांबर निर्मिती कंपनीला जंगलातील वणव्याने वेढले. यामध्ये उघड्यावर साठवूण ठेवलेले डांबरचे २० ड्रम व कच्च्या माल जळून नष्ट झाला. औद्योगिक वसाहतीमधील अग्निशमन दलाचे दोन बंब दाखल होत आगीवर नियंत्रण मिळवले. यामध्ये जीवितहानी टळली. या घटना सायंकाळी ५ वा. सुमारास घडल्या.



### पनवेलमध्येही दोन दुकाने जळून खाक



**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील टेंबुर्डे येथील फर्निचरच्या व चायनीज दुकानाला नववर्षाच्या पहिल्याच दिवशी आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीत दोन्ही दुकाने जळून खाक झाली आहेत.

टेंबुर्डे येथील फर्निचरच्या दुकानाला सोमवारी पहाटे ५.३० वा. च्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. दुकानात लाकडी वस्तू असल्याने आग वाढतच गेली. आगीची बातमी समजताच नवीन पनवेल सिडको अग्निशामक दलाने घटनास्थळी जावून आगीवार नियंत्रण मिळवले. ही आग पूर्णपणे विझवेपर्यंत फर्निचरचे दुकान जळून खाक झाले. बाजूलाच असलेले चायनिजचे दुकानही जळून खाक झाले.




### ट्रेलरच्या अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेलरच्या मागील चाकाखाली येऊन एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना तळोजा नावडे फाटा येथे घडली आहे. राम आशिष केवट (वय ३७) असे त्याचे नाव आहे.

ट्रेलरचालक गोपाळ साहू हा कोणतीही खातरजमा न करता ट्रेलर मागे, घेत असताना येथे झोपलेल्या रामआशिष यांच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी तळोजा पोलिसांनी ट्रेलरचालक गोपाळ साहूविरोधात गुन्हा नोंद करून त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# महावितरणच्या भरतीमध्ये वीजतंत्री, तारतंत्री अभ्यासक्रमांचा समावेश -मंत्री मंगल प्रभात लोढा

**मुंबई : प्रतिनिधी**

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण क्षेत्राकरीता कौशल्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मंडळामार्फत विविध कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्यात येतात. हे अभ्यासक्रम राज्यातील विविध संस्थांमार्फत राबविण्यात येतात. व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या अभ्याक्रमांचा महावितरण कंपनीच्या विद्युत सहाय्यक या पदभरती जाहिरातीतील शैक्षणिक अर्हतामध्ये करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाचा समावेश नोकर भरतीमध्ये केल्यामुळे राज्यातील विविध कौशल्यपूर्ण व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला चालना मिळेल, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यतामंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या पूर्वाश्रमीचे महाराष्ट्र व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाच्या दोन वर्ष कालावधीच्या वीजतंत्री आणि तारतंत्री अभ्यासक्रम प्रमाणपत्रांचा समावेश महावितरणच्या २९ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहिरात क्रमांक ०६/२०२३च्या विद्युत सहाय्यक या पदभरती जाहिरातीतील शैक्षणिक अर्हतामध्ये करण्यात आली आहे.

विविध उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यास मंडळ सुसज्ज आहे. मंडळाच्या अभ्यासक्रमांचा नोकर भरतीसाठी समावेश करण्यासाठी आम्ही महावितरण कंपनीचे आभारी आहोत. राज्यातील सर्व विभागांनीही त्यांच्या पदभरतीमध्ये मंडळाच्या विविध अभ्यासक्रमांचा समावेश करावा, असे आवाहन मंत्री लोढा यांनी सर्व विभागांना केले आहे. यामुळे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, नवीन कौशल्य, री-स्किलिंग, अप-स्किलिंग आणि रोजगार याद्वारे कौशल्य परिसंस्थेचा सर्वांगीण विकास होईल आणि कुशल मनुष्यबळ निर्माण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# उरण ग्रामीण रुग्णालयात गुणवत्ता टीमची भेट

**उरण : वार्ताहर**

गुणवत्ता आश्वासन अंतर्गत २०२३ वर्षातील मूल्यांकन करण्यासाठी उरण ग्रामीण रुग्णालय येथे डॉ. महेश कुमार माने बीड व डॉ. व्यंकटेश दुडे यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासाहेब कळेल उपस्थित होते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत (कायाकल्प) मूल्यांककरिता आलेल्या टीमने ग्रामीण रुग्णालय येथे आल्यानंतर प्रथम स्वच्छतेची पाहणी केली. त्यानंतर दवाखान्यातील पुरुष कक्ष, स्त्री कक्ष प्रसुतीत विभाग, ओटी विभाग, एक्स-रे विभाग, डेंटल विभाग, प्रयोगशाळा विभाग, कार्यालय, इंजेक्शन विभाग, ओपीडी विभाग, औषध विभाग, औषध भंडार, आयसीटीसी विभाग, टीबी विभाग वरील विभागात जाऊन टीमने संबंधित कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाची विचारणा करून व नोंदणीची पाहणी केली. त्यानंतर डॉ. महेश कुमार माने व डॉ. व्यंकटेश दुडे यांनी डॉ. बाबासो काळेल वैद्यकीय अध्यक्षक यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले.

त्यानंतर सुमन योजनेविषयी माहिती दिली व या योजनेसाठी काम करण्यास सुचविले या मूल्यांकनामध्ये डॉ. मृणालिनी कदम वैद्यकीय अधिकारी, डॉ. प्रज्ञा भगत, डॉ.प्रियंका कोळी, डॉ. स्वाती म्हात्रे, डॉ. स्नेहल कोळी, वैद्यकीय अधिकारी संतोष झापकर, दंतचिकित्सक महादेव पवार, समुपदेशक हेमा म्हात्रे, अधिपरीचरिका वावरे उपस्थित होते.



# अलिबाग कारागृहात आरोग्य, रक्ततपासणी शिबिर व मार्गदर्शन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग व जिल्हा कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग कारागृहातील बंद्यांसाठी कारागृह उपमहानिरीक्षक दक्षिण विभाग मुंबई योगेश देसाई व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच आरोग्य व रक्ततपासणी शिबिर झाले.



या वेळी कारागृह अधीक्षक अशोक कारकर, वरिष्ठ तुरुंग अधिकारी रामचंद्र रणनवरे, तुरुंग अधिकारी किशोर वारगे, शशिकांत निकम व कर्मचारी तसेच लायन्स क्लब श्रीबागचे अध्यक्ष संजय रावले, विभागीय अध्यक्ष प्रियदर्शिनी संजय पाटील, विद्याधर पैठणकर सदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या बंद्यांना जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग संजय माने यांनी एचआयव्ही/एड्स तसेच गुप्तरोग या आजाराबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. मितेश पाटील यांनी बंद्यांची आरोग्य तपासणी केली. लायन्स क्लब श्रीबागच्या माजी अध्यक्ष ॲड. कला पाटील यांनी बंद्यांचे मनोधैर्य वाढविण्याकरिता गाण्याच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. एकूण ९४ बंद्यांची आरोग्य व रक्ततपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, आरबीएसके विभागातील वैद्यकीय अधिकारी डॉ. मितेश पाटील, आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, समुपदेशक अर्चना जाधव, डीएसआरसी समुपदेशक सचिन जाधव, मोबाईल आयसीटीसी व्हॅन प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, साथी संस्थेचे प्रिझम पिअर मोबिलाझर सत्यनारायण इंगळे, एचएलएल लॅबच्या फ्लेबो जुईली पाटील हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ तुरुंग अधिकारी रामचंद्र रणनवरे यांनी करून जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग व लायन्स क्लब श्रीबाग यांचे आभार मानले.

# भारतीय जवानांचे 'एलओसी'वर न्यू ईयर सेलिब्रेशन

**श्रीनगर : वृत्तसंस्था**

देशभरात उत्साहाचे वातावरण असताना दुसरीकडे भारत पाकिस्तान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील गावातही उत्साह दिसून आला. एलओसीला लागून असलेल्या गावांमध्ये भारतीय लष्कराच्या जवानांनी स्थानिक लोकांसह न्यू ईयर सेलिब्रेशन केले.

नव्या वर्षाच्या पूर्वसंध्येला लोक जल्लोषात असल्याचे दिसून आले. रविवारच्या मध्यरात्रीनंतर नवा दिवस, नवे वर्ष सुरू झाले. देशभरात नव्या वर्षानिमित्ताने स्वागत दिसून आले. देशभरात उत्साहाचे वातावरण असताना दुसरीकडे भारत-पाकिस्तान प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील गावातही उत्साह दिसून आला. एलओसीला लागून असलेल्या गावांमध्ये भारतीय लष्कराच्या जवानांनी स्थानिक लोकांसह न्यू ईयर सेलिब्रेशन केले. रात्री उशिरा एलओसी चौकीवर गस्त आणि पहारा देण्यापूर्वी सैनिकांनी स्थानिकांसोबत गरम चहा घेतला. त्याशिवाय जेवण आणि नृत्य केले. जवानांनी ग्रामस्थांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

जम्मू-काश्मीरमधील उरी सेक्टरमधील एलओसीजवळील चुरुंडा गावात रविवारी सायंकाळी ४ वा. च्या सुमारास नवीन वर्षाचे सेलिब्रेशन सुरू झाले. या दरम्यान सैन्य आणि ग्रामस्थांनी एकमेकांना आनंदाच्या आणि आव्हानात्मक काळात साथ देण्याचा शब्द दिला.

# उपमुख्यमंत्री पवारांकडून विजयस्तंभास अभिवादन

**पुणे** : उपमुख्यमंत्री अजित पवार आणि क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे यांनी सोमवारी (दि.१) सकाळी पेरणेफाटा येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन केले.



या वेळी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, प्र. सह पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अरविंद चावरिया, पोलीस अधीक्षक अंकित गोयल, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण उपस्थित होते.

## पान १ वरुन

### भाजप कार्यकर्त्यांचा सन्मान करणारा पक्ष

माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी, माजी आमदार सुरेश लाड यांच्या प्रवेशाने जिल्ह्यात आपला पक्ष मोठा झाला आहे, असे अधोरेखित केले. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी हा सोहळा आपल्या सर्वांना ऊर्जा देणारा असल्याचे म्हटले. प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांनी सुरेश लाड चुकीच्या पक्षात होते. ते आता चांगल्या पक्षात आले आहेत, असे नमूद केले. जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी प्रास्तविकात सुरेश लाड यांनी कर्जत मतदारसंघात खूप कामे केली आहेत, असे सांगितले. विधानसभा प्रमुख किरण ठाकरे यांनी कर्जत मतदारसंघात हल्ली काही माणसे उड्या मारत आहेत, पण त्यांचे काय होणार आहे हे त्यांना लवकरच कळेल, असा टोला लगावला. उपस्थितांचे स्वागत मंडल अध्यक्ष राजेश भगत यांनी स्वागत केले.

या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष रजनी गायकवाड, पुष्पा दगडे, शीतल लाड, प्रतीक्षा लाड, मोनिका बडेकर, संदीप पाटील, स्नेहा गोगटे, राजू हजारे, नंदू लाड, विजय हजारे, जगदीश ठाकरे, सूर्यकांत गुप्ता, मंदार मेहेंदळे, प्रदीप घावरे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन जगदीश मराजगे आणि नम्रता कांदळगावकर यांनी केले.

### ट्रकचालकांच्या संपाला नवी मुंबईत हिंसक वळण

या कायद्याला विरोध म्हणून ट्रकचालक संपावर गेले आहेत. नवी मुंबईतही ट्रकचालक रस्त्यावर उतरले आणि त्यांनी बेलापूर-उरण महामार्ग रोखण्याचा प्रयत्न केला. या वेळी पोलिसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता ट्रकचालकांनी पोलिसांवर हल्ला करीत त्यांना लाठीकाठीने मारण्याचा प्रयत्न केला.

या प्रकरणी एनआरआय पोलिसांनी ४० ते ५० ट्रकचालकांना ताब्यात घेतले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. हे हल्लेखोर नेमके कोण होते त्यांची ओळख पटविण्याचे काम पोलीस करीत आहेत.

### नरेंद्र मोदींच्या पंतप्रधानपदाच्या हॅट्ट्रिकमध्ये मुस्लिम बांधवांच्या मतांचा सिंहाचा वाटा असेल

या आढावा बैठकीस अल्पसंख्याक मोर्चा मुंबईचे अध्यक्ष वसीम खान, प्रदेश उपाध्यक्ष तथा हज कमिटीचे सदस्य सलीम बागवान, महामंत्री विरू सिंग, कोकण प्रदेश सहप्रमुख साबीर शेख, उपाध्यक्ष फत्तू सय्यद, भिवंडी लोकसभा संयोजक जमशेद खान, कल्याण लोकसभा मतदारसंघाचे संयोजक बिलाल शेख, रत्नागिरी सिंधुदुर्ग संयोजक इफ्तेकार अत्तार, पालघरचे सहसंयोजक अल्ताब, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मन्सूर पटेल यांच्यासह संयोजक व पदाधिकारी उपस्थित होते.







इद्रिस मुलतानी या योग्य व्यक्तीला भाजप अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्षपदावर स्थान दिल्याबद्दल पनवेलच्या प्रसिद्ध समाजसेविका रिझवान दीदी, ॲड.महेबूब पटेल, जावेद पटेल, आरिफ शेख तसेच तळोजा येथील शफीक भट्टी, कासिम शेख यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावकुळे यांचे आभार मानले तसेच पनवेल नगरीत आलेल्या मुलतानी यांचा या वेळी सत्कार केला.

## थर्टीफर्स्ट, नववर्ष स्वागत सेलिब्रेशन
# नियम मोडणाऱ्यांवर कारवाई




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये थर्टी फर्स्ट आणि नवीन वर्षाचा जल्लोष मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. न्यू इयर पार्ट्यांसाठी अनेक ठिकाणी मेजवानीचे बेत आखून जोरदार तयारी करण्यात आली होती.

नववर्षाच्या सेलिब्रेशनला कोणतेच गालबोट लागू नये यासाठी परिमंडळ २चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर, पनवेल तालुका, खांदेश्वर, कळंबोली, कामोठे, खारघर, तळोजा, न्हावाशेवा, उरण पोलिसांनी दिवसरात्र गस्त घालून गैरकृत्याला चाप लावला. न्यू इयर सेलिब्रेशनच्या नावाखाली बेकायदेशीर कृत्य केल्याप्रकरणी परिमंडळ २ हद्दीमध्ये एकूण ५८६ कारवाया करण्यात आल्या आहेत.

थर्टी फर्स्ट सेलिब्रेशनसाठी मोठ्या प्रमाणात तरुणाई बेधुंद अवस्थेत पार्टीमध्ये सहभागी झाल्याचे पहायला मिळते. अनेकदा महिलांच्या छेडछाडीचे प्रकारही घडतात. ड्रिंक अँड ड्राइव्हमुळे अनेक अपघात घडतात. त्यामुळे थर्टी फर्स्ट सेलिब्रेशन तसेच न्यू इयर सेलिब्रेशनच्या धर्तीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता नागरिकांच्या सुरक्षेसाठी नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या सूचनेनुसार परिमंडळ २ हद्दीत पोलीस आयुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, ठिकठिकाणी पोलिसांची पथकदेखील तैनात करण्यात आली होती.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी ३१ डिसेंबर व नववर्ष स्वागतानिमीत्त कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीतील महत्वाच्या ठिकाणी कडेकोट नाकाबंदी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याकरिता विशेष मोहिम राबविण्याचे आदेश दिले होते.

याअनुषंगाने परिमंडळ २ हद्दीत पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी पनवेल विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, पोर्ट विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त धनाजी क्षिरसागार, परि.२ हद्दीतील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक व अधिकाऱ्यांना ३१ डिसेंबर व नववर्ष स्वागतानिमीत्त कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता विशेष मोहिम राबविण्याबाबत आदेश पारीत केले होते.

यादरम्यान नाकाबंदी व कारवाई करण्यासाठी उपायुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ०२ मधील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दोन सहाय्यक पोलीस आयुक्त, १६ पोलीस निरीक्षक, ७५ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरीक्षक व ४७० पोलीस अंमलदार असा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. नाकाबंदी दरम्यान नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ५८६ कारवाया करण्यात आल्या आहेत. यादरम्यान परिमंडळ २ कार्यक्षेत्रात सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये ३२ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली होती.

या वेळी ड्रिंक अँड ड्राइव्ह ६४, मोटार वेहीकल कायद्यानुसार २८९, ध्वनी प्रदूषण (लाऊड स्पीकर) कायद्यानुसार १७, अवैध मद्यविक्री १९, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन केल्याप्रकरणी ३३, सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्याप्रकरणी ८८, अवैधरित्या हुक्का सेवन केल्याप्रकरणी १, अंमली पदार्थांचे सेवन केल्याप्रकरणी १३, मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार विहीत वेळेनंतर फटाके वाजवून ध्वनी व वायू प्रदूषण केल्याप्रकरणी १५ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम ११/११७, ३३ डब्ल्यू/१३१ नुसार अश्लिल अंगविक्षेप व बीभत्स वर्तन केल्याप्रकरणी १५ याप्रमाणे एकूण ५८६ कारवाया करण्यात आल्या.

> **नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत परिमंडळ २ कार्यक्षेत्रात ३१ डिसेंबर व न्यु इयर सेलिब्रेशन शांततेत झाले. यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नाकाबंदी करून गैरप्रकारांना आळा घालण्यात आला. नागरिकांनीदेखील जागरूक राहून पोलीस प्रशासनाला चांगले सहकार्य केले. सर्वांना नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा.**
>
> **–पंकज डहाणे, पोलीस उपायुक्त**

## नववर्ष शुभेच्छा!



**पनवेल : नववर्षानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांच्या उपस्थितीत गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, ईश्वर कोळी, भार्गव ठाकूर, सुहास भगत, किशोर पाटील, सुजाता पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**








**पनवेल : नववर्षानिमित्त राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी दरवर्षीप्रमाणे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेत नवीन वर्षाची सुरुवात केली. या वेळी माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, वसंतशेठ पाटील, नारायणबुवा पाटील, न्हावे ग्रामपंचायतीच्या सदस्य ललिता बाळकृष्ण ठाकूर, बाळकृष्ण ठाकूर, सतीश ठाकूर, लक्ष्मण गावंड, लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, अशोक आंबेकर आदींनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन नवीन वर्षाच्या शुभेच्छाही दिल्या.**

## सीकेटी कॉलेजमध्ये नौदल एनसीसी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**




जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी ) विभागाच्या तर्फे २२ ते ३१ डिसेंबर २०२३ या दरम्यान दहा दिवसीय नौदल एन. सी. सी. शिबिराचे आयोजन केले होते.

दहा दिवसीय नौदल एनसीसी शिबिर कमांडिंग ऑफिसर कॅडर कमलकुमार कुर्रा यांच्या नेतृत्वाखाली झाले. या शिबिरात मुंबई आणि ठाण्यातील विविध शाळेतील एकूण २८१ कॅडेटसनी सहभाग घेतला होता. या शिबिराच्या माध्यमातून नॅशनल कॅडेटस् कौरच्या कॅडेट्सना संघ बांधणीचे व्यायाम,कवायती, शिस्तबद्धपणा आणि नेतृत्व कौशल्ये इत्यादी बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामध्ये गौरव कुमार यांचे नौदल या विषयावरचे मार्गदर्शन, सी.टी.ओ. धन्वंतरी यांचे व्यक्तिमत्व विकास या घटकावरचे मार्गदर्शन, दिवाकरन पिल्लई यांचे संवाद कौशल्य वाढविण्यावर अतिथी व्याख्यान यांचा समावेश होता. तसेच या शिबिरात सिडकोने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण प्रदान केले व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या सदस्यांद्वारे योग सत्रे आयोजित केली गेली.

या दहा दिवसीय नौदल एनसीसी शिबिराचा उद्देश हा कॅडेट्समध्ये सौहार्द वाढवून देशभक्तीची भावना जागृत करणे, त्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक वाढीसाठी मौल्यवान अनुभव प्रदान करणे हा होता. या शिबिराची सांगता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन झाली. या शिबिराच्या आयोजनासाठी असोसिएट एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट नीलिमा तिदार आणि सी.टी.ओ. जितेंद्र एम. पावरा यांनी विशेष परिश्रम केले.

शिबिर यशस्वी केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील आणि असोसिएट एनसीसी ऑफिसर मेजर प्रो. डॉ. उद्धव भंडारे यांनी कौतुक केले.

## करंजाडेत अक्षता कलश यात्रा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीराम जन्मभूमी आयोध्यामधून गर्भगृहामध्ये पूजन केलेला मंत्रवत अक्षतांचा कलश पनवेल शहरात आला आहे. त्या निमित्त कलश स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कलश यात्रा रविवारी (दि.३१) करंजाडेत येताच सरपंच मंगेश शेलार यांनी अक्षता कलश यात्रेचे करंजाडेत जंगी स्वागत केले.

या वेळी नागरिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. उपसरपंच सागर आंग्रे, कर्णा शेलार, बळीराम म्हात्रे, समीर केणी, मनखुष नाईक, संदेश पाटील, नाथाभाई भारवाड यांच्यासह आदि उपस्थित होते.

करंजाडे सेक्टर १ ते ६, चिंचपाडा, पुष्पकनगर आर १,२,३,४,५, कोल्ही कोपर, वाघिवली वाडा, वडघर, त्रिवेणी धाम याठिकाणी मिरवणूक काढून शिवमंदिर सेक्टर ६ करंजाडे येथे अक्षता कलश यात्रेचे पूजन करण्यात आले. अक्षता कलश यात्रेची सुरुवात पनवेल शहरातील कोळीवाड्यामधील जरीमरी मंदिर येथून उत्साहपूर्ण वातावरणात झाली. वाद्यांच्या गजरात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यासोबतच जय श्रीराम अशा गगनभेदी घोषणांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.






**पनवेल : माजी नगरसेवक जगदिश गायकर आणि भाजप नेते सोमेश्वर स्वामी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**
(छाया : विकास म्हात्रे)

## पोलिसांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर
### पनवेल महापालिकेचा उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका आरोग्य विभागातर्फे पोलीस बांधवासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याला पोलीस बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पनवेल तालुका पोलीस ठाणे आवारात पनवेल म.न.पा आरोग्य विभाग यांचे वतीने आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध चाचण्या या वेळी करण्यात आल्या. तसेच या वेळी त्यांना आवश्यक ते वैद्यकीय मार्गदर्शन व औषधे सुद्धा देण्यात आले. या आरोग्य शिबिराला पोलीस बांधवांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.



## पुनाडे येथे विविध कामांचे भूमिपूजन



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील पुनाडे येथील धरण फाटा ते आदिवासी वाडीवरील रस्ता व श्री हनुमान मंदिर व गावदेवी माता मंदिर येथील सभागृहाचे भूमिपूजन भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १) झाले.

या वेळी भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील, जिल्हा उपाध्यक्ष नीलकंठ घरत, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, माजी जि.प. सदस्य जीवन गावंड, देवेंद्र पाटील प्रीतम म्हात्रे कल्पेश पाटील, निलेश पाटील, नारायण शंकर पाटील, नारायण कमल पाटील, ग्रामपंचायत सदस्य रसिक पाटील, कुंदन ठाकूर, अंकिता ठाकूर, अक्षता पाटील, अमीर ठाकूर, अविनाश पाटील, पुनाडे बुद्ध अध्यक्ष संदेश पाटील, प्रसाद ठाकूर, महेश पाटील आदी उपस्थित होते.


## संपादकीय

# श्रीराम दीपावली

नव्या वर्षाने उजाडता उजाडता वर्षाची सुरूवात चांगली करून देण्याचे ठरवले आहे असे दिसते. येत्या २२ जानेवारीला अयोध्या नगरीत श्रीरामलल्ला भव्य मंदिरामध्ये विराजमान होतील तेव्हा अवघा देश चैतन्याने उजळून निघालेला असेल. या दिवशी भारतवासियांनी दिवाळी साजरी करावी असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. अर्थात त्यासाठी देशातील श्रीरामांचे भक्त तयारच असतील.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार २२ जानेवारीला घरोघरी दिवे आणि पणत्या लावल्या जातील. संपूर्ण देशभर दिवाळीचा सण पुन्हा अवतरला की काय असे वाटू लागेल. तसे होणे स्वाभाविक आहे कारण अयोध्येतील श्रीरामप्रभूंना त्यांचे घर परत मिळणार आहे. असंख्य वर्षे फाटक्या तंबूमध्ये राहिलेल्या श्रीराम लल्लांची मूर्ती विधिवत भव्य मंदिराच्या गर्भगृहात प्रतिष्ठापित होईल. या क्षणासाठी देशवासियांनी पाचशे वर्षे संघर्ष केला. कित्येक स्थित्यंतरे आणि संकटांनंतर हा दिवस उगवला आहे. नवे वर्ष उंबरठ्यावर असताना पंतप्रधानांनी राममंदिराच्या शुभारंभाची तारीख घोषित केली. या समारोहाला देशापरदेशातून लाखो लोक येणार आहेत. सर्व महत्त्वाच्या व्यक्तींना अधिकृत निमंत्रणे गेली आहेत. अर्थात निमंत्रणे न मिळाल्यामुळे काही जण हिरमुसलेलेदेखील आहेत! राममंदिराच्या लढ्यामध्ये ज्यांचे योगदान आहे अशांना मात्र निमंत्रण चुकलेले नाही. इतकेच नव्हे तर घरोघरी जाऊन निमंत्रणाच्या अक्षता वाटण्याचे काम सुरू आहे. देशातील कानाकोपऱ्यात अक्षत कलशयात्रा निघाल्या असून महाराष्ट्रदेखील त्यास अपवाद नाही. देशातील विविध नद्यांचे पाणी एकत्र करून ते श्रीरामार्पण करण्यासाठी अयोध्येला पाठवण्यात येणार आहे. तथापि, हा क्षण ऐतिहासिक आणि चिरस्मरणीय असला तरी देशवासियांनी २२ जानेवारी रोजी अयोध्येत गर्दी करू नये अशीही सूचना पंतप्रधानांनी केली आहे. रामलल्लांच्या दर्शनासाठी सावकाश मार्चनंतरच यावे आणि डोळे भरून दर्शन घ्यावे अशी विनंती पंतप्रधान मोदी यांनी रामभक्तांना केली आहे. या निमित्ताने अयोध्या नगरीने अक्षरश: कात टाकली असून त्रेतायुगात या नगरीचे वैभव किती लखलखीत असेल याची चुणूक आता बघायला मिळते. अयोध्येचा महर्षी वाल्मिकी विमानतळ तब्बल १० लाख यात्रिकांच्या स्वागताला तयार झाला आहे. सुसज्ज अशा विमानतळाबरोबरच अयोध्याधाम रेल्वेस्थानकाची देखणी इमारत उभी राहिली आहे. येथील विकासकामांची माहिती करून घेण्यासाठी देशभरातील शेकडो माध्यम प्रतिनिधींना काही दिवसांपूर्वी अयोध्येला निमंत्रित करण्यात आले होते. या नगरीचे नवे रूप पाहून वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी अक्षरश: स्तिमित झालेले दिसले. अयोध्येतील श्रीराम दीपावलीच्या दिवशी साऱ्या देशातील वातावरण राममय होणार आणि त्याचा प्रत्यक्ष फायदा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला होणार या कल्पनेनेच विरोधकांच्या झोपा उडाल्या आहेत. काँग्रेसने तर एकेकाळी श्रीरामांचे अस्तित्वच अमान्य केले होते. रामायण हे काल्पनिक असून श्रीलंकेला जोडणारा रामसेतू अस्तित्वातच नसल्याचा युक्तिवाद काँग्रेसी वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात केला होता. स्वर्गीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे श्रीराम चळवळीशी असलेले नाते कोणीही विसरणार नाही, परंतु त्यांच्या पश्चात उर्वरित ठाकरे गटाने सत्तेसाठी काँग्रेसशीच साटेलोटे केले. ठाकरे गटाच्या नेत्यांचा बराचसा वेळ हल्ली भाजप आणि श्रीराममंदिर निर्मितीच्या कामावर टीका करण्यातच जातो. यातच सारे काही आले. पंतप्रधान मोदी यांच्या आवाहनानुसार येत्या २२ जानेवारी रोजी देशभर श्रीराम दीपावली साजरी होईल. नव्या भारताचा तो खऱ्या अर्थाने शुभारंभ असेल.**

# आठवडी बाजारपेठेचे गाव बेलापूर



बेलापूर. बेलाच्या झाडांची मुबलकता असलेले गाव. नवी मुंबईतील सीमेवरील गाव. पण कधी काळी हे गाव रायगड जिल्ह्यात होते. पनवेल साष्टी तालुक्यात हे गाव मोडत होते. नवी मुंबईची ओळखच मुळात या गावच्या नावावरून. जुने नाव मांजरपाडा. दिवाळे, शाहाबाज, आग्रोली आणि बेलापूर हे चार पाडे. त्यांची मिळून बेलापूर-शाहाबाज ग्रामपंचायत. त्यातून नंतर बेलापूर वेगळे झाले. त्या काळी गावात सर्व प्रकारचा व्यापार होत होता. पंचक्रोशीतील बाजारपेठ अशी या गावची ओळख. आठवडी बाजार म्हणजे एकप्रकारची जत्राच. पहिली शाळा, पहिला टेलिफोन, पहिला दवाखाना, पहिली टुरिंग टॉकीज असे बरेच काही 'पहिले' या गावाच्या नावावर आहे.

तालुका वा जिल्ह्याचा कोणताही दर्जा नसताना पेशवेकालीन बेलापूर गावात ब्रिटिशांनी येथे न्यायालय आणि तुरुंग बांधला होता. ठाण्याहून संध्याकाळी सुटणारी एसटी रात्री मुक्कामाला राहून सकाळी सुटायची. बाजारपेठ असलेल्या गावाची गरज मात्र एका खासगी वाहतूकदाराने भागवली होती, मात्र सकाळ-संध्याकाळ ये-जा करणारी एसटी एवढीच काय ती शासकीय वाहतुकीची व्यवस्था. गावाच्या पूर्व-पश्चिम आणि दक्षिण या तीन बाजूने समुद्र, खाडी, मिठागरे आणि उत्तर बाजूला हिरवागार डोंगर, वनराई अशी निसर्गसंपन्न बेलापूर गावात तीन चित्रपटांचे चित्रीकरणदेखील झाले आहे. त्यातील जिंदगी चित्रपटात गावातील अनेकांनी भाग घेतला होता.

ठाणे-बेलापूर पट्टी असे १९७०पर्यंत असलेला हा ठाणे खाडीपलीकडील भूभाग एका दिवसात शासनाने नवी मुंबई केला. मुंबईला पर्याय ठरणारे शहर वसविण्याचा निर्णय झाला. त्या ठाणे जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर वसलेले बेलापूर गाव. त्यामुळेच या भागाला ठाणे-बेलापूर पट्टी असे म्हटले जात होते. पुणे गोव्याहून आल्यानंतर मुंबईच्या वेशीवर लागणारे नवी मुंबईतील पहिले गाव. पालिका क्षेत्रातील २९ गावांमध्ये सर्वात जास्त लोकसंख्या असणारे त्यावेळचे हे गाव. त्यावेळी उत्तर बाजूस म्हणजे आत्ताच्या पारसिक हिल भागात बेलाची झाडे आढळून येत असत. गावाच्या वेशीवरील हा दोन हजार एकर वने व ३५० एकर गुरचरण (शासकीय) भागात त्यावेळी बरीच निसर्गसंपदा होती. याच जंगलात त्यावेळी बेलाची झाडे आढळून येत होती. त्यावरून या गावाला बेलापूर असे नाव पडल्याची आख्यायिका आहे. पाचशे लोकवस्तीचे हे गाव आता दहा हजारांपेक्षा जास्त वस्तीचे झाले आहे.

गावाच्या जवळ असलेला पेशवेकालीन बेलापूर किल्ला आणि काही बुरुजांमुळे या गावाची दोन भागांत विभागणी केली गेली आहे. पूर्व भागात लोकवस्ती आणि पश्चिम भागात सागरी व्यापार उद्योग. बेलापूरला असलेला विस्तीण असा सागरी किनारा पाहता या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यांतून व्यापारउदीम केला जात होता. जसे हे काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या व्यापाराचे बेट होते. तसेच तो मुंबईमधील स्मगलरांचा हक्काचा किनारा होता. गावाच्या पूर्व बाजूस सात एकरवरचा तलाव आजही गावाची शान आहे. शहरीकरणात तो आता कमी करण्यात आला आहे. या तलावात जत्रेच्या काळात पोहण्याच्या स्पर्धा होत होत्या. तलावाजवळच श्रीशंकराचे जागृतेश्वर मंदिर आहे. मंदिराचा गाभा क्षेत्र तलावापेक्षा पाणी पातळीपेक्षा खाली आहे. वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना असलेल्या या शिवकालीन शिवमंदिरात बाजूच्या तलावाचा एक थेंब पाणी कधी घुसल्याचे ऐकिवात नाही. याच जागृतेश्वराला वाहण्यात येणारी बेलाची पाने मुबलक प्रमाणात या ठिकाणी मिळत होती. आज बेलापूर गाव आहे पण बेलाची पाने शहरीकरणाच्या या धबगड्यात नामशेष झाली. गावात बारा बलुतेदारांची वस्ती असल्याने गाव कसे गुण्या गोविंदाने नांदत होते.

केवळ बारा जातीचीच नव्हे तर धर्माचीदेखील मंडळी गावात होती. त्यामुळे पंचशील लोकवस्तीचे गाव अशी बेलापूरची एक नवी ओळख होती. चैत्र नवमीला रामनवमीच्या निमित्ताने होणारी जत्रा या गावचीच नाही तर संपूर्ण बेलापूर पट्टीची जत्रा ठरायची. चार-पाच हजार जत्रेकरूंचा जत्था या काळात बेलापूर मध्ये लोटायचा. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था गावातील अनेक रहिवाशी मोठ्या आवडीने करीत होते. एखाद्या हिंदी चित्रपटात शोभेल असा 'मेला' या गावात त्यावेळी लागत होता. कुस्ती आणि पोहण्याच्या स्पर्धा हा जत्रेचे मुख्य आर्कषण. कीर्तन, भजनात तर अख्खे गाव भक्तीमय होत होते. कपडे, शोभेच्या वस्तू, खेळणी याचबरोबर रॉड्रिक्स ऑगस्टीनच्या टुरिंग टॉकीजमध्ये एखाद्या चित्रपटाची मजा लुटली जात होती. अनेक मंदिराच्या स्थापनेमुळे धार्मिक परंपरा सांभाळणाऱ्या या गावाने दीडशे वर्षांपूर्वीच शैक्षणिक चळवळ उभारलेली आहे. बेलापूर पट्टीतील पहिली प्राथमिक मराठी शाळा इंग्रजांनी या गावात जून १९६५ रोजी सुरू केली.

ठाण्याकडील खैरणे-बोनकोड्यापासून ते उरण-पनवेलच्या कोपरा गावापर्यंतचे विद्यार्थी या शाळेत शिकण्यास येत होते. विशेष म्हणजे उलवा भागातील काही विद्यार्थी होडीने समुद्र पार करून या शाळेत हजेरी लावत होते. विद्या प्रसारक हायस्कूलच्या ओट्यापर्यंत समुद्राचे पाणी लागत होते. आज त्याच पाण्यावर सीबीडी शहर उभे राहिले आहे. सिडकोचे रेस्ट हाऊस ज्या ठिकाणी उभे आहे. त्या किल्ले गावठाण परिसरात इंग्रजांचे फौजदारी न्यायालय, पोलीस कोठडी, फाशी देण्याचे ठिकाण, कस्टमचे कार्यालय होते. ब्रिटिशकालीन हा ऐतिहासिक ठेवा काही वर्षांपूर्वी आपल्या सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणताही मागच्या पुढचा विचार न करता जमीनदोस्त केला. त्यामुळे या गावाची एक साक्षीदार असलेली इमारत नेस्तनाबूत झाली आहे. याच किल्याच्या दक्षिण बाजूस असलेल्या समुद्रकिनाऱ्यावर होणारी तस्करी आणि व्यापार यांच्यावर नजर ठेवण्यासाठी कस्टमने बोटीने प्रवास सहज करता यावा म्हणून बांधलेल्या समुद्राच्या पाण्यात उतरणाऱ्या पायऱ्या आजही शाबूत आहेत. याच भागात गोड्या पाण्याच्या दोन विहिरी असून पूर्व भागातही तीन विहिरी होत्या. त्यामुळे गावातील मुले पोहण्याचा मनमुराद आनंद लुटत होते.

विहीर, हौदात होणारा पोहण्याचा सराव नंतर जवळच्या समुद्रात लीलया केला जात होता. बेलापूर गाव जरी ४५ एकरवर वसले होते तरी मिठागरे, शेती यांचा परिसर ४५० एकर पेक्षा जास्त होता. आज जेथे सेंट्रल बिझनेस डिस्ट्रिक्ट (सीबीडी) म्हणून संपूर्ण शहर आणि कोकणाचा कारभार हाकला जातो. त्या सिडको, पालिका, कोकण भवन, पोलीस, कोकण रेल्वे, झिव्ह बँक याच्या काही टुमदार इमारती या बेलापूरकरांच्या जमिनींवरच उभ्या आहेत तर काही खारजमिनीवर. महात्मा गांधीच्या दांडी यात्रेसह अनेक आंदोलनात सहभागी होणारे या गावातील पाच-सहा तरुणांना स्वातंत्र्यसैनिक म्हणूनही काम केले आहे. पण त्यांना तसे ताम्रपट हाती पडले नाही. जिवंत आणि चैतन्यमय असणाऱ्या या गावातील राजकीय कारकीर्द टप्प्याटप्प्याने बहरली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, क्रीडा, राजकीय पटलावर नेहमीच चर्चेत राहणाऱ्या गावाने बेलाच्या पानाप्रमाणे आपली 'वाहून' घेण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'ही' सेटिंग सुरू असल्यास हॅक होऊ शकतो फोन




लोकांना अडकवण्यासाठी हॅकर्स विविध पद्धती वापरतात. अशीच एक पद्धत व्हॉट्सअ‍ॅपच्या सेटिंगद्वारे त्यांनी शोधली आहे. व्हॉट्सअ‍ॅपवर असे अनेक फीचर्स आहेत जे डिफॉल्ट म्हणून ऑन असतात. हे फीचर्स फक्त तुमचा अधिक डेटा वापरत नाहीत तर तुमच्यासाठी धोकादायकदेखील ठरू शकतात. मोबाईल हॅक होण्यासाठी बरेचदा आपल्या मोबाईलवर अवलंबून असते. त्यामुळे मोबाईलची सेटिंग किंवा एखाद्या अ‍ॅपमधील सेटींग योग्य करून घेणे फार महत्त्वाचे आहे. व्हॉट्सअ‍ॅपमध्येही ती सेटिंग केल्यास आपला मोबाईल हॅक होण्यापूसन बचाव होऊ शकतो.

असंच एक फीचर म्हणजे व्हॉट्सअ‍ॅप मीडिया ऑटो डाउनलोड. या फीचरच्या मदतीने तुमच्या व्हॉट्सअ‍ॅपवर येणारा मीडिया ऑटोमेटिक डाउनलोड होतो. हे फीचर डीफॉल्टमधून ऑन असतं. यामध्ये तुम्हाला फोटो, व्हिडीओ, ऑडिओ आणि डॉक्युमेंट्सचे पर्याय मिळतात. तुम्ही हे सेट करू शकता.

हॅकर्स याचा फायदा कसा घेऊ शकतात हे सर्वप्रथम आपण समजून घेतले पाहिजे. बऱ्याच प्रकरणांमध्ये हॅकर्स इमेजमध्ये लपवलेले मालवेअर पाठवतात. कोणीतरी हे फोटो, डॉक्यूमेंट्स किंवा फाइल्स डाउनलोड करतं. हॅकर्स फोन हॅक करतात. डिफॉल्ट सेटिंगमध्ये हा सर्व मीडिया ऑटो डाउनलोडवर असतो. अशा परिस्थितीत हॅकर्स तुमच्या फोनमध्ये सहज घुसू शकतात.

तुम्ही हे सेटिंग बंद केलं तर बरं होईल. यासाठी तुम्हाला व्हॉट्सअ‍ॅप सेटिंगमध्ये जावे लागेल. येथे तुम्ही सर्व सेटिंग्ज मॅन्युअलवर सेट करू शकता. यासाठी तुम्हाला मीडिया डाउनलोड लिस्टमधील सर्व पर्याय अनचेक करावे लागतील. अनचेक केल्यानंतर, फक्त तुम्ही डाउनलोड केलेला मीडिया डाउनलोड केला जाईल. कोणताही मीडिया आपोआप डाउनलोड होणार नाही आणि हॅकर्सना संधी मिळणार नाही.

# समाजसुधारक महर्षी विठ्ठल रामजी शिंदे



## निमित्त

कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता काम करणारे थोर समाजसेवक म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे. त्यांनी इंग्लंडला जावून त्या काळी उच्चशिक्षण घेतले. त्यानंतर भारतात परतल्यानंतर मोठमोठाले मान-सन्मान आणि नोकऱ्या नाकारून अस्पृश्यता निवारण आणि स्वातंत्र्यलढ्यात वाहून घेतले. शेतकरी चळवळीलाही बळ दिले. या थोर समाजसेवकाचा आज २ जानेवारी रोजी स्मृतिदिन. त्यांच्या अफाट कार्याची ही ओळख.

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकातील जमखंडी येथे त्यांचा जन्म झाला. त्यांनी प्रारंभी जमखंडी येथे शिक्षकाची नोकरी केली. पुढे वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. त्यासाठी त्यांना प्रार्थना समाजाने मदत केली. भारतात परतल्यानंतर त्यांनी मिळणारे सारे मान सन्मान, उच्च अधिकाराच्या जागा नाकारल्या आणि स्वत:ला प्रार्थना समाजाच्या कार्याला वाहून घेतले. आपल्या समाजाला अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, कर्मकांड, रुढी आणि परंपरांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी अवघे जीवन समर्पित केले.

विठ्ठल रामजी शिंदे यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला. अस्पृश्यता निवारणाचे काम हाती घेतले. अस्पृश्य समजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, अस्पृश्यांना नोकरीची संधी मिळवून देणे, त्यांच्या अडचणी सोडवणे, त्यांना खऱ्या धर्माची शिक्षण देणे, त्यांच्या प्रगती आणि ज्ञानाची तहान निर्माण करणे यासाठी त्यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. अस्पृश्य समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करण, अस्पृश्य बांधवांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या अडचणींचे निवारण करणे, अस्पृश्यांना खऱ्या धर्माची शिकवण देणे आणि त्यांचे शीलसंवर्धन घडून आणणे ही या मिशनची वैशिष्ट्ये होती.

'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' संस्थेच्या माध्यमातून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी अनेक उपक्रम हाती घेतले. त्यांमध्ये अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरू करणे, त्यांच्यासाठी वसतिगृहे उघडणे, शिवणकामाचे वर्ग चालवणे, प्रबोधनपर व्याख्याने कीर्तने आयोजित करणे, आजारी असणाऱ्या लोकांची सेवा करणे, इत्यादी गोष्टींचा समावेश या संस्थेच्या कार्यामध्ये होता. संस्थेच्या अकोला, अमरावती, इंदूर, कोल्हापूर, ठाणे, दापोली, पुणे, भावनगर, मद्रास, मालवण, मुंबई, सातारा, हुबळी, इत्यादी ठिकाणी उघडण्यात आल्या होत्या. सोबतच १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिला. त्याद्वारे या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे काम केले.

विठ्ठल रामजी शिंदे एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी शेतकऱ्यांसाठी काम केले. त्यांना जागृत आणि संघटित करण्यासाठी त्या काळात शेतकरी परिषदांचे आयोजन केले. १९२० ते १९२६ या काळात त्यांनी शेतकरी चळवळ उभी केली, पण सरकारने तुकडे बंदीचे बिल मागे घेताच चळवळीत वाद सुरू झाले आणि चळवळ थांबली. आपल्या समाजातील पददलित, उपेक्षित वर्गाच्या उन्नतीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत ते झटले. या थोर समाजसेवकाने २ जानेवारी १९४४ रोजी या जगाचा निरोप घेतला.

वि. रा. शिंदे यांनी विपुल लेखन केले. त्यांच्या आत्मपर लिखाणाचे अनेक खंड प्रकाशित झाले आहेत. पहिल्या खंडात भारतीय 'अस्पृश्यतेचा प्रश्न : संशोधन आणि चिंतन' हे लेखन आहे. दुसऱ्या खंडात महर्षी शिंदे यांच्या चार रोजनिशींचा समावेश असून, 'माझ्या आठवणी व अनुभव' हे ३७५ पानी आत्मचरित्र व काही प्रवासवर्णने आहेत. 'माझ्या आठवणी व अनुभव' नावाचे हे आत्मचरित्र तीन भागांत आहे. इंग्लंडमधील रोजनिशीत त्यांनी प्रथम त्यांच्या बोटीवरील प्रवासाबद्दल लिहिले आहे. ब्राह्मो समाजास शंभर वर्षे झाली, त्यानिमित्ताने शिंदे यांनी पश्चिम बंगालची सफर केली. तेव्हा ते ब्राह्मो उपासना केंद्रे चालवणाऱ्या रवींद्रनाथांना भेटले. त्यानंतर शिंदे पूर्व बंगालमध्ये गेले. तेथे त्यांनी वेगवेगळ्या शहरांत व गावांत ब्राह्मो धर्मावर भाषणे दिली.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!






**पनवेल : सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नववर्षाच्या स्वागतासाठी शहरातील प्रसिद्ध वडाळे तलाव परिसरात आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. ती पाहण्याकरिता नागरिकांनी गर्दी केली होती.** (छाया : रोहित जगताप)

## आरोग्य प्रहर

# 'या' सवयींमुळे नववर्षात निरोगी राहण्यास मदत

नवीन वर्षाची सुरूवात झाली आहे. नवीन वर्ष प्रत्येकासाठी आशेचा किरण घेऊन येत असतं. नवीन वर्षानिमित्त लोक त्यांच्या जीवनात बदल करण्यासाठी अनेक संकल्प ठरवतात. अशा परिस्थितीत आज अशा काही सवयींबद्दल जाणून घेऊ, ज्या तुम्हाला नवीन वर्षात निरोगी राहण्यास मदत करतील. येत्या वर्षभरात तुम्हालाही निरोगी राहण्यासाठी तुमच्या काही सवयी बदलायच्या असतील, तर हे नक्की वाचा. चला जाणून घेऊया कोणत्या सवयी बदलून तुम्ही निरोगी राहू शकता.



**वेळेवर झोपणे** – आजकाल लोकांच्या झोपण्याच्या आणि खाण्याच्या वेळा पूर्णपणे बदलल्या आहेत. बरेच लोकं रात्री उशिरा जेवतात आणि झोपायला बराच उशीर होतो. अशा स्थितीत हे देखील आजारांचे मोठे कारण बनू शकते. त्यामुळे सर्वप्रथम सर्व कामे वेळेवर करण्याची सवय लावा. लवकर जेवा आणि लवकर झोपा. कमीत कमी ८ तासांची झोप घ्या.

**स्ट्रेस मॅनेज करा** – आजच्या काळात, प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या कारणाने चिंतित किंवा स्ट्रेसमध्ये असतो. पण काही लोकांना जास्तच काळजी करण्याची सवय असते. त्यामुळे मानसिक आरोग्याच्या समस् निर्माण होऊ शकतात. म्हणून, तुमचा स्ट्रेस व्यवस्थापित करण्यासाठी, तुम्ही ध्यान आणि माइंडफुलनेस यासारख्या स्ट्रेस मॅनेजमेंट तंत्रांचा अवलंब केला पाहिजे.

**व्यायाम करणे फायदेशीर** – शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी शरीर सक्रिय ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी रोज व्यायाम करण्याची सवय लावावी. यासाठी तुम्ही मॉर्निंग वॉक, व्यायाम, योग किंवा डान्स क्लास यासारखे उपक्रम करू शकता. व्यायामाने शरीरा आणि मन दोन्ही तंदुरुस्त राहते.

**खाण्या-पिण्याच्या चांगल्या सवयी** – आजकाल लहान मुले असो वा तरुण, जंक फूड आणि पॅक फूड खाणे सर्वांनाच आवडते. पण ते आपल्या आरोग्यासाठी अतिशय हानिकारक ठरू शकते. त्यामुळे या नवीन वर्षापासून घरचे बनवलेले अन्न आणि सकस अन्न खाण्याची सवय लावा.

**वाचन करणे** – वाचन हा सगळ्यात उत्तम छंद आहे. दिवसातला काही वेळ चांगलं काही वाचण्यात घालवावा. त्यामुळे आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. यासोबतच तुमचे विचार आणि तुमचे पुढील दिवसाचे वेळापत्रक डायरीत लिहीण्याची सवय लावावी. या चांगल्या सवयींमुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते.

# पर्यटकांकडून जलप्रवासाला पसंती

## परतीच्या प्रवासात मेरीटाईम बोर्डाचे नियोजन



**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी लाखो पर्यटक रायगडात दाखल झाले होते. यात समुद्रसफरीचा आनंद घेत येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी दिसून आली. या पर्यटकांचा परतीचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने नियोजन केले.

मुंबई परिसरातील पर्यटक गेटवे ऑफ इंडिया आणि भाऊचा धक्का येथून बोटीने अलिबागला पोहचले. पर्यटकांची संख्या लक्षात घेऊन फेरीबोट आणि रो-रो सेवेच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या होत्या. मागील दोन दिवसांत २० हजार पर्यटक जलमार्गे अलिबागला आल्याचा अंदाज आहे. मांडवा जेटीचे बंदर निरीक्षक आशिष मानकर आणि मांडवा सागरी पोलीस प्रभारी गोविंद पाटील यांनी भेट देऊन नियोजन केले. बोट कंपनीनुसार बॅरीगेटींग करून प्रवाशांना जेटीवर मार्ग निश्चित करून दिल्याचे त्यांनी सांगितले.



## अलिबाग बसस्थानकात गर्दी

**अलिबाग बसस्थानकात सोमवारी (दि. १) पर्यटकांची गर्दी होती. बसस्थानकात प्रवाशांच्या लांब रांगा लागल्या होत्या. दोन दिवसांत आलेले पर्यटक एकाच दिवशी परतण्यसाठी निघाल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. वाहतूक कोंडीत बसेस अडकल्यामुळे अलिबाग बसस्थानकात बस उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांचे हाल झाले. याचा फटका स्थानिकांनाही सहन करावा लागला.**

## पर्यटनवृद्धीसाठी राज्य शासन कटिबद्ध –मंत्री आदिती तटकरे



**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणात समुद्रकिनारी पर्यटकांची संख्या खूप वाढली आहे. पर्यटन महोत्सव पर्यटकांना मुक्काम करण्यास भाग पाडतात.पर्यटकांसाठी विविध नवीन ठिकाणे तयार करणे व मूलभूत सुविधा देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून आगामी काळात पर्यटन वृद्धीसाठी आम्ही निश्चित प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महिला व बालकल्याण मंत्री अदिती सुनील तटकरे यांनी केले. पर्यटन महोत्सवात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या वेळी व्यासपीठावर महोत्सव समितीच्या अध्यक्ष कल्पना पाटील, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष फिरोज घलटे, शिवसेना शहराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका मेघाली पाटील, युगा ठाकूर, महोत्सव उपाध्यक्ष प्रकाश सरपाटील, वीरेंद्र भगत, राष्ट्रवादी शहराध्यक्ष संजय गुंजाळ, तालुका संघटक दिनेश मिणमिने आदी उपस्थित होते.

या वेळी पाककला स्पर्धेमध्ये शाकाहारी विभागात प्रथम सुश्मिता गुरव, द्वितीय क्रमांक वंदना नाझरे, तृतीय क्रमांक जयश्री प्रधान यांना मिळाला. मांसाहारी विभागात प्रथम साची घरत, द्वितीय सायली घरत, तृतीय क्रमांक सिया अपराध यांना मिळाला

३१ डिसेंबरचे औचित्य साधून सुप्रसिद्ध लावणी नृत्यांगना गौतमी पाटील यांचा कार्यक्रम पहाण्यासाठी प्रेक्षणी मोठी गर्दी केली होती.

## मुंबई-गोवा महामार्गाची खासदार सुनील तटकरेंकडून पाहणी



**नागोठणे : बातमीदार**

मुंबई-गोवा महामार्गाची खासदार सुनील तटकरे यांनी सोमवारी (दि. १) पाहणी केली व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. ठेकेदार कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर राजेंद्र गुप्ता व महामार्गाचे डेप्युटी मॅनेजर सत्यम शेठ यांना सूचना देऊन ग्रामस्थांचे समाधान केले.

या वेळी राष्ट्रवादीचे नेते भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, हरीश काळे, विलास चौलकर, कृष्णा धामणे, संतोष कोळी, बाळासाहेब टके, रोशन पारंगे, अंकुश ताडकर, शिंदे गटाचे प्रवीण ताडकर, आकाश मढवी, दिलीप आवाद, दिपेंद्र आवाद, वणी उपसरपंच महेंद्र हंबीर, किसन बोरकर, मधुकर मढवी, विक्रांत घासे, पळस सरपंच निष्ठा विचारे, नितीन राजीवले आदी उपस्थित होते. चिकणी येथे सचिन कळसकर, पाटणसईचे माजी उपसरपंच नरेश देवरे, वाकणनाका येथे रोहा पं. स. चे माजी सभापती सदानंद गायकर, पांडुरंग गायकर, कानसई येथे मोहन पवार, निवास पवार, उल्हास पवार व सुकेळी खिंड येथे जानु वारगुडे यांनी समस्या खासदार तटकरे यांना सांगितल्या.

खासदार तटकरे यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी धुळीमुळे प्रवाशांसह स्थानिकांना त्रास होत असल्यामुळे पाण्याचा टँकर सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हॉटेल कामतपासून पाच किमी. काँक्रिटीकरणचे काम तत्काळ सुरू करून मला दररोज झालेल्या कामाची प्रगती माझ्या व्हॉट्सअॅपवर पाठवायची सूचना केली आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी इंदापूरपर्यंतच्या कामासाठी ७५० कोटींचा निधी दिला आहे. नागोठणे कोएसो विद्यासंकुलनाजवळील ओव्हरब्रिजचे कामही लवकरच सुरू होईल, असे त्यांनी सांगितले.

## रोह्यात नेत्रतपासणी शिबिराला प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी (दि. १) १६१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६७ रुग्णांना आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले.



या शिबिरातील उर्वरित १३ नेत्ररुग्णांची शस्त्रक्रिया मंगळवारी दोन टप्प्यात करण्यात येणार आहेत. शिबिरात अल्पदरात चष्मे वाटपही करण्यात आले. शंकरा आय हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. अश्विन पवार, नियती शिंदे, सिद्धी मोरे, समृद्धी उतेकर, प्रवीण पाटील, सागर पाटील आदींनी रुग्णांची तपासणी केली. रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, मिलिंद अष्टिवकर, महेश सरदार, संदीप सरफळे, श्रीकांत ओक, इल्यास डबीर, दिनेश जाधव, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, अहमद दर्जी, उस्मान रोहेकर, परशुराम चव्हाण, राजेश काफरे, निलेश शिर्के, शैलेश रावकर, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, रिद्धी बोथरे, बिलाल मोरबेकर आदींनी परिश्रम घेतले.


**पनवेल महानगरपालिका**

**ता. पनवेल, जि. रायगड ४१० २०६**

**अंदाजपत्रक बनविणेकामी दरपत्रक**

पनवेल महानगरपालिकेतील विधी विभागाकरीता कार्यालयीन कामकाजासाठी संगणक प्रणाली तयार करणेबाबत या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील https://mahaternders.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

**पमपा/मातंवि/३०२३/प्र.क्र.५/०१ /२०२३-२४**
**दिनांक: ०१/०१/२०२४**

सही/-
(कैलास गावडे)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका


## ‘विद्यानिकेतन’चे स्नेहसंमेलन उत्साहात



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका विद्याप्रसारक मंडळाचे स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतन विद्यालयाच्या वतीने निनाद वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. एव्हरेस्ट वीर संतोष दगडे यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे कार्याध्यक्ष मुकुंद मेढी, शालेय समिती अध्यक्ष नंदन भडसावळे, सदस्या रोहिणी जोशी आदी उपस्थित होते. माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मीरा कडू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार भोईर याने प्रास्ताविक केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका माया म्हसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

या वेळी रांगोळी प्रदर्शन, विज्ञान गाथा, कलाविश्व दालनांचेही उद्घाटन करण्यात आले. एव्हरेस्ट वीर दगडे यांनी एव्हरेस्ट शिखर सर करताना आलेला अनुभव सांगितला.

मुकुंद मेढी यांनी अध्यक्षीय भाषणात नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन जागृती दाभाडे तर आभार प्रदर्शन शिल्पा गायकवाड यांनी केले.

## पोलादपूर येथे उद्यापासून तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पंचायत समिती पोलादपूर आणि स्व. शां. शं. जाधव न्यू इंग्लिश स्कूल पळचिलच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३ व ४ जानेवारी रोजी शहरातील श्रीदेवी गंगामाता सभागृहामध्ये तालुका विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

आंबवडे सैनिक विकास मंडळ फौजी आंबवडेचे अध्यक्ष सुभेदार श्रीराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते बुधवारी प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून आहे. गुरूवारी विविध स्पर्धांमधील व विज्ञान प्रदर्शनातील विजेत्यांना गौरविण्यात येणार आहे. पहिल्या दिवशी नोंदणी, प्रतिकृती मांडणी, उद्घाटन, प्रदर्शन पाहण्यासाठी खुले, निबंध स्पर्धा, प्रतिकृती परिक्षण, वक्तृफ्त्व स्पर्धा; तर दुसऱ्या दिवशी प्रश्नमंजुषा, प्रदर्शन पाहण्यासाठी खुले, प्रतिकृती परीक्षण तसेच पारितोषिक वितरण व समारोप असे आयोजन करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १०९ सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे **बी-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील सुडकीराम साळवी यांचे घरापासुन ते शरद साळवी यांचे घरापर्यंत सिमेंट क्रॉकिंट रस्ता बनविणे. | २०४४९२२/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील विश्राम साळवी यांचे घरापासुन ते गावकीच्या विहरीपर्यत सिमेंट क्रॉकिंट रस्ता बनविणे. | २०४३२१३/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील मु. पार्ले बौध्दवाडी गावच्या वेशीपासुन निलेश सुदाम साळवी यांचे घरापर्यत सिमेंट क्रॉकिंट रस्ता बनविणे. | २०४२६४७/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील जुने बुध्द विहार पासुन ते गणपत साळवी यांचे घरापर्यत सिमेंट क्रॉकिंट रस्ता बनविणे. | २०३९७११/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ५ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील गंगाधर जाधव यांचे घरापासुन ते मु. पार्ले बौध्दवाडी वेशीपर्यत बंदिस्त गटार बनविणे. | २०३९२६०/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | मु. पार्ले बौध्दवाडी पोस्ट चांढवे ता. पोलादपुर जिल्हा रायगड येथील श्री. मधुकर पाटेकर यांचे घरापासुन ते भिकाजी जाधव यांचे घरापर्यंत सणारा मोळा नाला बंदिस्त करणे. | २०३८७४१/- | २१०००/- | ५९०/- | ६ महिने | वर्ग पाच अ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०३/०१/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१०/०१/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक **१२/०१/२०२४** वेळ ११.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५९५९**
**दिनांक : २९/१२/२०२३**

सही/
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड



**सिडको** शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे करारनामा / वाटपपत्र प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | भूसंपादन व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता.पनवेल, जि.रायगड | | | | | | | | |
| १. | उलवे ३९६ | गव्हाण १३०/१५१ | २४१/६ | ०-०३-८ | ४० चौ.मी. प्रस्तावित | **उलवे नोड येथील भुखंड क्र. २३A, सेक्टर-१५A, क्षेत्र-४० चौ.मी.** | भूधारक १) कै. मंजुळा चैताराम घरत (मयत) यांचे वारस १.१) श्री.जयवंत भाऊ घरत (मयत) यांचे वारस १.१.१) श्रीमती तनुजा जयवंत घरत, १.१.२) कु. तेजल जयवंत घरत, १.१.३) कु. हिमेश जयवंत घरत, २) श्रीमती सुषमा फिनुद पाटील, ३) श्रीमती रोषणा संतोष गायकवाड, ४) श्रीमती पार्वती कृष्णा पाटील, ५) श्रीमती शांताबाई बामा तांडेल २) कै.गोपीनाथ गोमा घरत (मयत) यांचे वारस २.१) श्री. अण्णा गोपीनाथ घरत, २.२) श्री. सुरेश गोपीनाथ घरत (मयत) यांचे वारस २.२.१) श्रीमती रुक्मिनी सुरेश घरत, २.२.२) श्रीमती कविता काळूराम पाटील, २.२.३) श्रीमती स्वाती महेश पाटील, २.२.४) श्रीमती आरती दिनेश सुतार, २.२.५) श्रीमती विद्या प्रफुल्ल म्हात्रे, ३. श्रीमती रेखा रघुनाथ म्हात्रे ४. श्रीमती वनीता दयाराम म्हात्रे | – |
| | | | **एकूण** | **०-०३-८** | | | | |
| २. | कोपर ७५० | ८६ | ८६/९ | ०-३१-२<br>०-०४-० | **२८९.९९ चौ.मी.** | **नोड करंजाडे** येथील **सेक्टर क्र.१, मधील भूखंड क्रं. २५A, क्षेत्र-२८९.९१ चौ.मी.** | **मुळ भूधारक पांडू खंडू म्हात्रे कै. जोमा रखमा कराडी (मयत) यांचे वारस** १) श्रीमती. कमळूबाई गंगाराम भोईर २) श्रीमती. बयोबाई सुदाम गोवारी ३) श्रीमती. मरीबाई कृष्णा कराडी उर्फ शिंदे ४) श्री. धर्मेंद्र कृष्णा कराडी उर्फ शिंदे ५) श्री. धाया कृष्णा कराडी उर्फ शिंदे ६) श्रीमती. कमलाबाई प्रल्हाद पाटील ७) श्रीमती. राजेश्री रमेश भगत | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/४९६/२०२३-२४

# पनवेल आरटीओची महसुलात आघाडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात गेल्या वर्षभरात ५३ हजार २७६ नवीन वाहनांची नोंदणी झाली आहे. यात २९ हजार ६७८ दुचाकी तर १४ हजार ३४१ चारचाकी वाहनांची समावेश आहे. तसेच इलेक्ट्रीक जवळपास तीन हजार इलेक्ट्रीक वाहनांची नोंद झाली असल्याने वर्षभरामध्ये तब्बल ४४२ कोटी ४० लाखांचा महसूल जमा झाला आहे

उप-प्रादेशिक परिवहन विभागाने कर वसुलीबरोबरच रस्ता सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या नियमांचे पालन व्हावे यासाठी पनवेल परिवहन विभागाने विविध कारवाया केल्या आहेत. त्यातून विभागाच्या उत्पन्नात भर पडली. तसेच वाहन व परवाना नोंदणी, नूतनीकरण, विविध प्रकारच्या परवान्यांचे शुल्क, तसेच व्यवसाय कर, पर्यावरण कर, आकर्षक क्रमांकातून मिळणारे उत्पन्न, वायुवेग पथकाच्या कारवाया, क्षमतेपेक्षा जादा माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना दंड, अवैध प्रवासी वाहनांच्या दंडातून शुल्क स्वरूपात मिळालेल्या रकमेबरोबर वर्षभरात विविध ठिकाणी कारवाई करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे पनवेल परिसराचा विकास झपाट्याने होत असल्याने वाहनांची संख्या वाढली आहे.




**वर्षभरातील वाहन खरेदीची संख्या**

दुचाकी २९,६७८, चारचाकी १४,३४१, ट्रक-ट्रेलर ५,५००, मिटर टॅक्सी ४२५, ऑटो रिक्षा १,६१२, स्कूल बस १९०, जेसीबी २१९, क्रेन १४९, रुग्णवाहिका ४२, ट्रॅक्टर ६०, इतर १,०६०

**इंधनावरील वाहने**

डिझेल/पेट्रोल : ४४,०४१
पेट्रोल/सीएनजी : ६,२७६
इलेक्ट्रीक (ईव्ही) : २,९१९

**दुचाकी, चारचाकी वाहनांमध्ये आवडता नंबर घेण्याचा ओढा तरुणांमध्ये आहे. तसेच वायुवेग पथकाने केलेल्या कारवायांतून मिळालेला दंडाच्या रकमेचा वाटाही अधिक आहे. त्यामुळे साहजिकच महसूल वाढला आहे.**
**-गजानन ठोंबरे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल**




# कळंबोलीचा शिवम शुक्ला पायी निघाला अयोध्येला

**कळंबोली : बातमीदार**

अयोध्यातील जागतिक स्तरावर सर्वांत जास्त चर्चेत असलेल्या श्रीराम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याची संपूर्ण जगाला आतुरता आहे. या क्षणाचे साक्षीदार व्हावे अशी सर्वांचीच मनोकामना आहे. कळंबोलीतील शिवम संतोष शुक्ला हा २४ वर्षांचा तरुण कळंबोलीतून अयोध्येला पायी चालत निघालेला आहे. त्याच्या जिद्दीला सलाम करण्यासाठी कळंबोली पोलिसांनीही त्याला संरक्षण देत हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



गेल्या अनेक शतकापासून हिंदू धर्मियांचे आराध्य दैवत असलेल्या श्रीरामचंद्रांच्या अयोध्या येथे साकार होत असलेल्या सुंदर मंदिराचे लोकार्पण २२ जानेवारी रोजी अयोध्येमध्ये होत आहे. साऱ्या जगातून या सोहळ्याला उपस्थित राहण्यासाठी मान्यवर व्यक्ती येणार आहेत. तरुण-तरुणी वर्गातही या कार्यक्रमाची उत्सुकता शीगेला पोहचली आहे. कळंबोली मधील शिवम संतोष शुक्ला या २२ वर्षे तरुणाने कळंबोली ते आयोध्या पायी जाण्याचा निर्धार केला असून तो नुकताच कळंबोलीतून पायी चालत योध्येकडे निघाला आहे. दोन दिवसांपूर्वी पहाटे निघालेल्या या शुभम शुक्लाला हार्दिक शुभेच्छा देण्यासाठी कळंबोलीतील पोलीस अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. दररोज तो पन्नास किलोमीटर पायी चालणार आहे.

या वेळी ज्या मंदिर, शाळेत तो थांबणार आहे तेथे सुंदर भारत, स्वच्छ भारत, बेटी पढाव बेटी बचावचा नारा देऊन जनजागृती ही करणार आहे. त्याच्या या पायी चालत जाण्याचा यात्रेला कळंबोलीतील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, क्षेत्रातील मान्यवरांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# प्रेम, मैत्री, आकर्षण, व्यसन विषयावर सीकेटी महाविद्यालयात जागृतीपर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे शनिवारी (दि. ३० डिसेंबर) युवा मानस रंग क्लब आणि कौन्सिलिंग विभागाच्या वतीने प्रेम, मैत्री, आकर्षण आणि व्यसन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमास परिवर्तन संस्थेचे सदस्य रुपाली भोसले, राजू इनामदार, राणी बाबर, आरती अजय कुमार फॅशन डिझाईनिंग विभागाच्या प्रमुख सुचित्रा गवळे, इंटेरियर डिझाईनिंग विभागाच्या प्रमुख प्रज्योती देसाई व कौन्सिलिंग विभागाच्या प्रमुख व मानसरंग -एमएसएफडिए प्रकल्पाच्या समन्वयक स्वाती परब व २५ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शवली.


या कार्यक्रमाची सुरुवात ॲक्शन साँगने करण्यात आली त्यानंतर वेगवेगळे गट करण्यात आले व प्रत्येक गटाने पूर्ण वर्षात काय शिकलो, तसेच अडचणी काय आल्या व युवकांचे काय प्रश्न होते याबद्दल सादरीकरण केले. व्यसन कसे लागते याविषयावर लघुपट दाखवण्यात आला आणि शेवटी प्रेम, मैत्री, आकर्षण हे कसे ओळखायचे ह्यावर सविस्तर पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी प्रेम, मैत्री, आकर्षण याबाद्दलचे शिक्षण खेळीमेळीच्या वातावरणात मिळाले असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे व प्राचार्य प्रो. डॉ.एस. के. पाटील यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# नवी मुंबई पालिका मुख्यालयाला आकर्षक रोषणाई

**नवी मुंबई : बातमीदार**

सरत्या वर्षची अखेरीस पालिकेची इमारत सप्तरंगात महापालिकेची इमारत सप्तरंगात न्हाऊन निघालेली दिसली.आधीच पालिकेचे इमारत निळ्याशार खाडीतील पाण्याभोवाती डोंगररंगांच्या कडेला हिरवळीत ही इमारत खुलून दिसते. त्यात ३१ डिसेंबरला सायंकाळी केलेली आकर्षक रोषणाई मात्र डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली.



नववर्षाच्या स्वागतासोबतच पालिकेचा वर्धापनदिन असल्याने मुख्यालय दिव्यांनी उजळले आहे. सप्तरंगी दिव्यांची सजावट मुख्यालयावर करण्यात आली होती. दोन दिवस आधीपासूनच दिव्यांची उधळण होत असल्याने नागरिक येता जाता आकर्षित होताना दिसत होते. नवी मुंबई शहरात सध्या पालिकेची वास्तू हे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरत आहे. अमेरिकेतल्या व्हाईट हाऊसची जशी ओढ नागरिकांना असते. तशीच ओढ विकएंड व सणासुदीला पाहायला मिळते. पालिका मुख्यालयाचा शांत परिसर म्हणजे मॉर्निंग वॉक करणाऱ्यांचे हक्काचे ठिकाणच होऊन बसले आहे. तिन्ही बाजूने हिरवळ, एकबाजूने डोंगर तर एकबाजूने खाडी असल्याने सदैव मनमोहक व आल्हाददायक वातावरण अनुभवयास मिळते. प्रत्येकाच्या हातातील मोबाईल पालिकेची छबी आपल्या कॅमेऱ्यात टिपत होते तर फोटो काढताना नागरिकांच्या मोबाईल कमेऱ्याच्या प्रकाशामुळे जणू 'तारे जमी पर' असेच वाटत होते.लहानमुलांसाठी विविध रंगांचे आकारांचे फुगे आणि खेळणी विकणारे फिरत होते. त्यात एलईडी लाईट्स असणाऱ्या फुग्यांनी तर हिरवळीवर काजवे चमकत असल्याचा भास होत होता. या फुग्यांच्या प्रेमात लहानगे तर पडलेच होते यात मोठ्यांनाही आपले फुगे प्रेम दाखवून आपली हौस पूर्ण केली. तर तरुणांचा घोळका सेल्फी काढण्यात मग्न होता. कौटुंबिक सेल्फी घेताना प्रत्येकजण नटलेल्या पालिकेलादेखील तितकेच स्थान देताना दिसला. गुलाबी थंडी व त्यात हिरवळ त्यामुळे लहानग्यांना चेव आलेला दिसत होता.

विविध धर्मांतील नागरिक एकत्र आल्याने २१व्या शतकातील कॉस्मोपोलिटन शहराची जाणीव यानिमित्ताने झाली.जसजसे घड्याळाचे काटे नववर्षाच्या दिशेने सरकत होते तसतशी गर्दी वाढत होती. मुख्यालयाला साक्षी ठेवून प्रत्येकजण २०२४ सालातील संकल्प आखताना दिसत होता.

# कळंबोलीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा होणार मेळावा

**कळंबोली : बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजित पवारांनी बंड केल्यानंतर सर्वत्र दोन गट प्रकर्षाने दिसून आले. पनवेलमध्येही अजित पवार गटाने आपली कंबर कसली असून आगामी काळात राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे प्राबल्य दिसून येण्यासाठी येथील माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव पाटील यांची पनवेल जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. आगामी काळात पक्षाची ध्येय धोरणे आणि पक्षाचे प्राबल्य वाढवण्यासाठी मेहनत घेणार असल्याचे या वेळी महादेव पाटील यांनी सांगितले आहे. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात अजित पवारांच्या उपस्थितीत कळंबोली कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित करण्याचा मनोदय महादेव पाटील यांनी व्यक्त केला आहे.



कोकण आणि मुंबईचे प्रवेशद्वार समजल्या जाणाऱ्या पनवेलमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे महापालिकेत दोन नगरसेवक निवडून आले होते. तसेच महापालिका होण्याच्या पूर्वी कळंबोलीमध्ये जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिले होते, मात्र राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी फूट पडल्यानंतर रायगड जिल्ह्यातील पक्षाचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांना मानणारा मोठा गट पनवेलमध्ये कार्यरत आहे. यातील कळंबोलीतील माजी जिल्हा परिषद सदस्य महादेव पाटील यांचे पनवेल जिल्हा अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीने पक्षातील तरुण आबाल कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करून सर्वांनी एकोप्याने काम करून पक्षाचे प्राबल्य पनवेल तालुक्यामध्ये वाढवण्यासाठी काम करणार असल्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

कळंबोलीमधील के एल टू च्या इमारतींचे असलेला प्रश्न हा अजित पवार व रायगडचे भाग्यविधाते सुनीलजी तटकरे यांच्या माध्यमातून तडीस नेण्याचा निर्धार यावेळी महादेव पाटील यांनी व्यक्त केला आहे. आगामी काळात पक्षाची ध्येयधोरणे पक्षाचे प्राबल्य व पक्षाची शक्ती दिसण्यासाठी अजित पवार व रायगडचे भाग्यविधाते सुनीलजी तटकरे यांच्या उपस्थितीत कळंबोलीत कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा आयोजित करून शक्तिप्रदर्शन केले जाणार आहे तसेच मोठ्या संख्येने तरुण, तरुणी महिला वर्ग अजित पवार गटाकडे येत असून आगामी काळात पक्षाची ताकद निश्चितपणे वाढल्याशिवाय राहणार नसल्याचे मत या वेळी नूतन जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांनी व्यक्त केले आहे.

# जासई विद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये महाराष्ट्र शासनाचे नागरी संरक्षण अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण झाले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपासाठी प्रमुख अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, बी.एम.एस. पोर्ट महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री आणि कामगार नेते सुरेश पाटील हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगत सांगितले की, समाजाच्या सेवेसाठी आपत्तीमध्ये धावून जाणे हे मोठे राष्ट्रीय कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य पार पाडण्यासाठी आपण सर्व प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले आहे त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन व पुढील कार्या साठी शुभेच्छा दिल्या.



विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी प्रमुख पाहुण्यांचे विद्यालया मार्फत स्वागत केले. या प्रशिक्षणाचे प्रमुख मार्गदर्शक एम. के. म्हात्रे (सहाय्यक उपनियंत्रक नागरी संरक्षण, रायगड) आणि हरेश्वर पाटील यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले. हे प्रशिक्षण पाच दिवस चालले. या प्रशिक्षणाची व्यवस्था महाराष्ट्राचे रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख यांनी केली व त्यांना सहकार्य ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख एस.एस. शिंदे यांनी केले.

# निलम सोमानी ठरल्या 'पनवेल आयटी क्वीन'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नववर्ष स्वागताचे औचित्य साधून इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन यांच्या वतीने महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी पनवेल इंडस्ट्रीयल टाऊन (आयटी) क्वीन या स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्रमांक निलम सोमानी, द्वितीय डॉ. जयश्री पाटील, तृतीय डॉ. मनिषा कांबळे यांनी पटकावला.

या स्पर्धेमध्ये सर्व क्षेत्रातील प्रतिष्ठीत महिलांनी सहभाग उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर आदींचा समावेश होता. कॅटवॉक फक्त मॉडेल्सच करू शकतात असे नसून सर्व सामान्य महिलादेखील करू शकतात, छान उत्तरे देऊ शकतात.

या कार्यक्रमांमध्ये प्रेसिडेंट सई पालवणकर, डॉ. राजश्री बागाडे, डॉ. जयश्री पाटील, कल्पना नागवकर, शुभांगी वालेकर, वृषाली सावलेकर, डॉ. साधना गांधी, डॉ. मनिषा कांबळे, परीक्षक कविता सुनका, डॉ. वैभवी भट आदींचे सहकार्य लाभले.



# राजेंद्र बोऱ्हाडे यांची चेअरमनपदी निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृह या ११४ वर्ष जुन्या नामांकित शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या चेअरमनपदी मुंबई शाखेचे माजी विद्यार्थी राजेंद्र बोऱ्हाडे यांची पुढील पाच वर्षासाठी निवड नुकतीच एकमताने करण्यात आली. आंबेगाव तालुक्यातील कानसे या गावचे सुपुत्र मुंबई येथे संस्थेच्या विद्याभवन येथील वसतिगृहात राहुन शालेय शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. विद्याभवन घाटकोपर येथे आपली नोकरी करत असतानाच संस्थेने २००९ मध्ये संचालक पदी निवड केली.



त्यांनी २०१६ ते २०२१ पर्यंत पाच वर्षांसाठी कोषाध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळला. संस्थेप्रती उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांची ही निवड सार्थ अभिमानाची आहे, असे मत माजी कार्याध्यक्ष प्राचार्य कृ. ना. शिरकांडे यांनी व्यक्त केले. याचबरोबर उपकार्याध्यक्ष म्हणून सुभाष जिर्गे, कार्यवाह म्हणून संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष म्हणून कृष्णाजी कुलकर्णी व कुलसचिव म्हणून दिनेश मिसाळ यांची ही निवड करण्यात आली. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# अक्षता कलश यात्रेनिमित्त दिवाळेत महाआरती

**नवी मुंबई : बातमीदार**

अयोध्यावरून आलेल्या पवित्र 'अक्षता कलश यात्रा' चे नवी मुंबईत भक्तिमय वातावरणात आगमन झाले असून, बेलापूर येथील दिवाळे गावात जय श्रीराम नामाच्या घोषणा देत, शंख नाद करत, पवित्र मंत्रोच्चारांनी व ढोल ताशाच्या गजरात अक्षता कलशाचे स्वागत करण्यात आले. तसेच, गावातील हनुमान मंदिरात रोजी दिवाळे ग्रामस्थांच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी, स्थानिक भजनी मंडळींनी सहभागी होऊन टाळ - मृदूंगाच्या गजरात भक्तिमय वातावरणात महाआरती झाली.



अयोध्येत राम मंदिराचे बांधकाम वेगाने सुरू आहे. २२ जानेवारी २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवनिर्मित रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा राम मंदिरात केली जाणार आहे. जसजसे दिवस पुढे जात आहेत, तसे यासंदर्भातील तयारीला वेग आला आहे. या सोहळ्यासाठी हजारो भाविक अयोध्येत जाणार आहेत. राम मंदिर आणि रामलल्ला प्राणप्रतिष्ठा यांमध्ये आपलाही काही खारीचा वाटा असावा, असे अनेकांना वाटत आहे. या पार्श्वभूमीवर दिवाळे ग्रामस्थ मंडळाने 'अक्षता कलश यात्रा'चे स्वागत करून हनुमान मंदिरात अभिषेक आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. त्याची नित्य नियमाने पूजा अर्चा करण्यात आली.

दरम्यान, या 'अक्षता कलश' यात्रेला संपूर्ण दिवाळे ग्रामस्थांसह विश्व हिंदू परिषदेचे बेलापूर प्रखंड मंत्री स्वरूप पाटील, गावचे पाटील परशुराम पाटील, संतोष कोळी, रमेश कोळी, अंकुश कोळी, सुभाष कोळी, देवनाथ कोळी, गंगेश कोळी, नवनाथ कोळी, हरिचंद्र कोळी, अशोक गझने, दुर्गेश कोळी, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, एकविरा मित्र मंडळ, ज्ञानराज प्रासादिक भजन मंडळ, शिव शंकर प्रासादिक भजन मंडळ, सिद्धिविनायक म्युझिकल बिड्स, तसेच गावातील आठही वलकरी मंडळांचे या वेळी विशेष सहकार्य लाभले.

प्रत्येक श्रीराम भक्ताच्या घरी जाऊन पूजलेल्या अक्षता, प्रभू श्रीरामांचे छायाचित्र आणि जवळच्या मंदिरातील कार्यक्रमाचे निमंत्रण देण्याची योजना आखण्यात आली आहे. दरम्यान, गावातील प्रत्येक घरापर्यंत १ ते १५ जानेवारी २०२४ पर्यंत संपर्क करण्यात येईल. २२ जानेवारी रोजी सर्व रामभक्तांनी आपल्या राहत्या ठिकाणच्या मंदिरात सकाळी ११ ते १ या कालावधीत भजन, कीर्तन, नामजप करून आनंदोत्सव साजरा करण्याचे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे बेलापूर प्रखंड मंत्री स्वरूप पाटील यांनी या वेळी केले आहे.

# ई-रिक्षामुळे माथेरानचे पर्यटन बहरतेय!

## पायपीट थांबल्याने पर्यटकांसह स्थानिकांमध्ये समाधान

**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरान हे मुंबई, पुण्याजवळचे जागतिक पर्यटनस्थळ आहे. येथील मिनीट्रेनमध्ये बसून निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी अनेक जण येथे भेटी देत असतात. त्याचप्रमाणे आता ई-रिक्षादेखील येथे सुरू करण्यात आल्याने पर्यटकांसह स्थानिकांसाठीही सोयीचे झाले आहे. त्यामुळे येथील पर्यटन बहरण्यास सुरुवात झाली आहे.

माथेरानमध्ये फिरण्यासाठी घोडे आणि हातरिक्षांव्यतिरिक्त कोणताही पर्याय नव्हता. हातरीक्षा चालवणे म्हणजे ती ओढण्याचे काम माणसे करतात. हा अमानवी प्रकार अनेकांना पटत नसे. त्यावर उपाय म्हणून माथेरानमध्ये पर्यावरणपूरक व्यवस्था व्हावी यासाठी अनेक जण प्रयत्नशील होते.

शिक्षक सुनील शिंदे यांनी आपले सहकारी शकिल पटेल आणि प्रकाश सुतार यांना बरोबर घेऊन सर्वोच्च न्यायालयात लढा द्यायचा असा निर्णय घेतला. १२ वर्षे ते हा लढा देत राहिले. त्यांना यश आले. दरम्यानच्या काळात नगर परिषदेची मुदत संपली आणि तेथे प्रशासक म्हणून मुख्याधिकारी असलेल्या सुरेखा भणगे यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला. भणगे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार आणि सनियंत्रण समिती व जिल्हाधिकाऱ्यांच्या प्राप्त सूचना, आदेश व वेळोवेळीच्या मार्गदर्शनानुसार कोणत्याही परिस्थितीत ई-रिक्षा सुरू करण्याला प्राधान्य देऊन प्रामाणिक प्रयत्न सुरू केले.

श्रमिक रिक्षा संघटनेच्या १२ वर्षांच्या संघर्षाला अखेरीस यश मिळाले थांबलेला ई-रिक्षा प्रकल्प दत्तजयंतीच्या मुहूर्तावर पुन्हा सुरू झाल्या. ई-रिक्षा सुरू झाल्याला पाच दिवस झाले. या पाच दिवसात ३,८०४ प्रवाशांनी प्रवास करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



## निवडक

### किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन शिबिर



**रोहा** : सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लि.च्या वतीने श्रमिक विद्यालय चिल्हे येथे किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य व स्वच्छतेवर आधारित शिबिर सीएसआर मुख्य कार्यक्रम प्रमुख माधुरी सणस यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थिनींनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेणे व स्वच्छता राखणे, योगाच्या माध्यमातून तंदुरुस्त राहणे याविषयी सखोल मार्गदर्शन करून प्रशिक्षण देण्यात आले. सुदर्शन केमिकलचे सीएसआरचे चेतन चौधरी, क्षेत्र अधिकारी अमर चांदले, संस्थेचे सुप्रिया पाटील, प्रशिक्षक वग व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग उपस्थित होते.

### पत्रकार संघ अध्यक्षपदी सलीम शेख



**माणगाव** : तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील ज्येष्ठ पत्रकार सलीम मुबारक शेख यांची फेरनिवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. पत्रकार संघाची सभा नववर्षाच्या शुभमुहूर्तावर सोमवारी (दि.१) शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली होती. या सभेत संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रसिद्ध उद्योजक खेमचंद मेथा यांच्या सूचनेनुसार तीन वर्षांकरिता नवीन कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली. त्यास प्रभाकर मसुरे यांनी अनुमोदन दिले. अध्यक्षपदी सलीम शेख, कार्यध्यक्षपदी मजिद हाजिते, उपाध्यक्षपदी प्रभाकर मसुरे, संतोष गायकवाड, सचिव सचिन देसाई, सहसचिव स्वप्ना साळुंके, खजिनदार निलेश म्हात्रे, मार्गदर्शक खेमचंद मेथा, सल्लागार सुभाष दळवी, आजेश नाडकर, कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. केदार गांधी, अ‍ॅड. सदफ येलुकर, सदस्य देवयानी मोरे अशी कार्यकारिणी निवडण्यात आली.

# मुंबई-गोवा महामार्गावर पहाटे धुक्याची चादर

**महाड : रामप्रहर वृत्त**

दोन दिवसांपासून तापमानाचा पारा चांगलाच घसरला असून गारठा वाढला आहे. तालुक्यात महामार्गासह घाटमार्गावर धुक्याची झालर पसरल्याने वाहनांचा वेग मंदावला आहे. हवेत दुपारी १२ वाजेपर्यंत गारवा जाणवत असून ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसतात.

थंडीची लाट उसळल्याने तालुक्यातील अनेकांनी ठेवणीतील उबदार कपडे वापरात काढले आहेत. बाजारपेठ, महामार्गालगत लोकरीचे कपडे विक्रीसाठी दुकाने थाटली आहेत.

थंडीमुळे आरोग्याची काळजी घेत सकाळी व्यायाम करणाऱ्या व फिरायला जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. ग्रामीण भागात थंडी अधिक असल्याने नागरिकांकडून



नाक्यानाक्यावर शेकोटी पेटवण्यात आल्याचे दिसते.

पुढील महिनाभरात थंडीची लाट आणखी वाढण्याची शक्यता आहे. महामार्गावरील राजेवाडी फाटा तर राज्य मार्गवरील वरंध, माझेरी वाघजाईसह महाबळेश्वर मार्गावरील आंबेनळी घाट, वाडा-कुंभरोशी आदी मार्ग, डोंगररांगावर धुक्याची चादर पसरलेली दिसते. यामुळे चालक संथ गतीने वाहने चालवत आहेत.

# नववर्षात पर्यटकांच्या सेवेत येणार दुसरी रो-रो बोट

**रायगड : रामप्रहर वृत्त**

मांडवा ते मुंबईदरम्यान चालणाऱ्या अत्याधुनिक रोरो बोटसेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या बोटीवर पर्यटकांचा वाढता ताण लक्षात घेऊन कंपनीने ५५ कोटी रुपयांची दुसरी रोरो खरेदी केली आहे. ही बोट ग्रीसमधून थेट मुंबईच्या दिशेने निघाली आहे. जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात ही बोट मुंबईत पोहचणार आहे.



सागरमाला उपक्रमांतर्गत जलवाहतुकीला प्राधान्य देण्याची महत्त्वाकांक्षी योजना केंद्र सरकारने आखली होती. त्यानुसार १५ मार्च २०२० रोजी मुंबईची पहिली अत्याधुनिक रो-रो बोट सुरू झाली. ही बोट भाऊचा धक्का ते मांडवादरम्यान सुरू आहे. गेल्या तीन वर्षांत २० लाखांपेक्षा जास्त पर्यटकांनी रो-रो सफरीचा मनमुराद आनंद लुटला, मात्र एकच बोट असल्याने देखभाल दुरुस्ती आणि फेऱ्यांची संख्या वाढविता येत नाही. त्यामुळे मुंबई ते मांडवा दरम्यान दुसरी बोट सुरू करण्यात येणार आहे.

रामदास बोटीच्या अपघातानंतर पावसाळ्यात प्रवासी फेरीबोटीला बंदी घालण्यात आली होती, मात्र रो-रो बोटीमुळे आता पावसाळ्यातही जलवाहतूक शक्य झाली आहे. त्यामुळे पारंपरिक फेरी बोटीतून प्रवास करणारे प्रवासी पावसाळ्यात रो-रो बोटीकडे वळले आहेत.

रो-रोची लोकप्रियता बघता सागरी महामंडळ मुंबई ते काशीद आणि मुंबई ते दिघीदरम्यान सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यानुसार काशीद बंदर आणि दिघी बंदरावर रो-रो जेट्टी उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

# चर्चेतून प्रश्न सोडवू -मंत्री अदिती तटकरे

## अंगणवाडी सेविका व मदतनिसांना आश्वासन

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस संपावर आहेत. त्यांच्या संघटनेबरोबर माझ्या चार बैठका झाल्या असून त्यांचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य शासन संवेदनशील आहे. अंगणवाडी कर्मचारी यांचा प्रश्न चर्चेतून सुटू शकणार आहे. यासाठी त्यांनी प्रथम कामावर हजर व्हावे जेणेकरून कोणाचे नुकसान होणार नाही, असे आवाहन राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी केले आहे.

येथील पर्यटन महोत्सवास भेट देण्यासाठी तटकरे आल्या असताना त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे वेतन नुकतेच मार्च २०२३मध्ये वाढवले आहे. काम ठप्प करणे हा मार्ग नाही. अंगणवाडी सेविकांनी कामावर रुजू होऊन चर्चा करावी. यामधून मार्ग निश्चित निघणार आहे. ग्रॅच्युटीबाबतची प्रक्रिया सुरू असून लवकरच फायदा मिळणार आहे.

नवीन वर्षात राज्य शासन लेक लाडकी योजनेला भरीव वाढ करणार आहोत. केंद्र व राज्य शासनाच्या महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या सर्व योजना एका छताखाली राबवून जास्तीत जास्त फायदा महिला वर्गाला कसा होईल याकडे सध्या आम्ही लक्ष केंद्रित केल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. केसरी व पिवळे शिधापत्रिकाधारकांना मुलीचा जन्म झाल्यानंतर विविध फायदे मिळवून देणार आहोत. मुख्यमंत्री महिला सक्षमीकरण योजना प्रभावीपणे राबवून महिलांचे जास्तीत जास्त प्रस्ताव सादर करून त्यांना फायदे मिळवून देण्याचा मानस या वेळी मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

# नागोठण्यातील ऊर्दू हायस्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन


**नागोठणे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील नागोठणे एज्युकेशन सोसायटीच्या ऊर्दू हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात कुराणच्या पठणाने करण्यात आली.

मान्यवरांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये जवळपास ५० प्रतिकृती बालवैज्ञानिकांनी बनविले होते. प्रतिकृतीचे परीक्षण रोहा तालुक्यातील विज्ञान गणित मंडळाचे अध्यक्ष टिळक खाडे तसेच अंजुमन इस्लाम जंजिरा स्कूल रोहाचे विज्ञान शिक्षक रमझान सर यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात शाळेतील ज्येष्ठ शिक्षक लाडजी बागबान यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉलेजचे प्राध्यापक डॉ. अनिस शेख यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी तसेच पालकांनी मेहनत घेतली.



**खालापूर : श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास अयोध्या येथून आलेल्या श्रीराम मंगल अक्षता कलशाचे वणवे-निंबोडे ग्रामस्थ व माता भगिनींनी भक्तिभावाने पूजन करून प्रभू श्रीरामांचे आशीर्वाद घेतले. या वेळी सहभागी सर्व भाविकजनांचे भाजप आध्यात्मिक संस्थेचे हभप काशिनाथमहाराज पार्टे यांनी आभार व्यक्त केले.**

# नेरळ विद्यामंदिराचे स्नेहसंमेलन उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

विद्यामंदिर मंडळाच्या ममदापूर येथील नेरळ विद्यामंदिर विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. पाचवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांच्या वार्षिक गुणगौरव आणि सांस्कृतिक कार्यक्रम झाले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक बाळकृष्ण पादिर तसेच नाट्यकलावंत आकाश भडसावळे, डॉ. ऋतुजा वाघमारे हे उपस्थित होते.



संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद पोतदार, संस्थेचे संयुक्त कार्यवाह विवेक पोतदार, संस्थेचे कोषाध्यक्ष एस. एम. देशमुख, कार्यकारिणी सदस्य दिलीप गडकरी आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. मुख्यध्यापक पी. बी. विचवे, उपप्राचार्य एम. के. परदेशी, शाळेचे माजी मुख्याध्यापक प्रकाश राठोड, माजी ज्येष्ठ शिक्षक प्रभाकर चासकर, पर्यवेक्षक डी. एस. गजभिये, संस्थेच्या मातोश्री टिपणीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष राजू झुगरे, सचिव राखी पोतदार, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सुमित्रा गायकवाड, सुभाष नाईक, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रतिमा विशे, माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय रामकृष्ण बागुल आणि वार्षिक बक्षीस समिती प्रमुख नम्रता खैरनार, संजय पाटील आदी उपस्थित होते.

सुरुवातीला अहवाल वाचन पर्यवेक्षक गजभिये यांनी केले तर सूत्रसंचालन शिल्पा लाड यांनी केले. कार्यक्रमात आदर्श विद्यार्थीनी म्हणून नम्रता राजाराम हुर्डेकर तर आदर्श विद्यार्थी म्हणून राज भगवान कदम यांना सन्मानित करण्यात आले.

अभिनेते आकाश भडसावळे यांनी, विद्यार्थ्यांनी संवाद साधताना याच व्यासपीठावरून शाळेतून माझी वक्तृत्व स्पर्धेला सुरुवात झाली. कोणतेही विक्रम हे मोडण्यासाठी असतात. त्यामुळे मी कोणाचे विक्रम मोडले यापेक्षा कोणता विक्रम केला हे महत्त्वाचे, असे आकाश भडसावळे यांनी स्पष्ट केले.

वासूची सासू या प्रयोगातील काही पात्र यावेळी आकाश आणि राजू झुगरे यांनी यावेळी सादर केली, तर अध्यक्षीय भाषण संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार यांनी केले.

# श्रीवर्धनमध्ये आरोग्य शिबिर

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

येथील एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

केंद्र शासनाच्या आयुष्मान भव या योजनेंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, श्रीवर्धन यांच्या सहकार्यामुळे सिकलसेल व आयुष्मान कार्ड नोंदणी कार्यक्रम झाला.

उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धनच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचिता गोरे यांच्या मार्गदर्शन या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सिकलसेल आजाराबाबातचे मार्गदर्शन उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धनचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ महाजन व डाकी यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिया दिवेकर हिने केले. सहाय्यक प्राध्यापक तृप्ती विचारे यांनी प्रास्ताविक केले, तर अनिल वाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# हिरवळ महाविद्यालयात तरंग कार्यक्रम उत्साहात साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट सीसीएसआयटी, रात्र महाविद्यालय, ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने तरंग २०२३ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून ट्रस्टच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी, सेक्रेटरी संतोष बुटाला, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट आणि हिरवळ प्रतिष्ठानचे सदस्य प्रदीप शेठ, हिरवळ प्रतिष्ठानचे सदस्य जय अंबुर्ले, गुरुकुल अकॅडमीच्या प्राचार्य वासंती राजप्पन, सीईओ जेएसएम फिन्सप्रो प्रा. लि. आणि कोकण क्रेडिट अँड कलेक्शन सर्व्हिसेस प्रायवेट लिमिटेड जगदीश वर्तक, केबल नेटवर्कचे कुणाल गुरव साईदीप, अध्यक्ष युवा अस्मिता फाउंडेशन कुणाल चव्हाण हे उपस्थित होते.

जवळपास २७ विविध प्रकारच्या कलाविष्कारांनी प्रेक्षकांवर भुरळ घातली. महोत्सवात महाविद्यालयाने आयोजित केलेल्या स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तृतीय वर्षाच्या परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. सर्वोत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार ईशा प्रदीप पार्टे हिला देण्यात आले, तसेच मिस्टर हिरवळ हा पुरस्कार कुमार वसिल कलसेकर तृतीय वर्ष बी. कॉम, तर मिस हिरवळ हा पुरस्कार साक्षी वर्मा तृतीय वर्ष बीएमएस हिला देऊन मान्यवरांच्या हस्ते मुकुट घालून सन्मानित करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेच्या मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली.



## अल्टीमेट खो-खो सीझन २

# मुंबईचा राजस्थानवर रोमहर्षक विजय



**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

अल्टीमेट खो-खोच्या सीझन २मध्ये झालेल्या सामन्यात मुंबई खिलाडीसने राजस्थान वॉरियर्सवर एक गुणाने रोमहर्षक विजय साजरा केला, तर तेलुगू योद्धासनेही ओडिशा जगरनॉट्सवर एक गुणाने निसटता विजय मिळवला. हे सामने कटक येथील स्टेडियमवर झाले. या सामन्यांमध्ये दिपेश मोरे व श्रीजेश एसला अष्टपैलू खेळाडूंचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

मुंबई खिलाडीसने राजस्थान वॉरियर्स वर ३१-३० (मध्यंतर १४-१३) असा एक गुणाने विजय मिळवला. या सामन्यात राजस्थानच्या विजय हजारेने उत्कृष्ट संरक्षण केले. वृषभ वाघने ड्रीम रन्सचा एक गुण मिळवून दिला, तर मुंबईच्या पी. शिवा रेड्डीने चार गुण मिळवून दिले. दुसऱ्या टर्नमध्ये मुंबईच्या हृषिकेश मुर्चावडेने जवळजवळ १.५० मि. संरक्षण केले. प्रतिक देवारे व सिबीन एम यांनी ड्रीम रन्सचे दोन गुण मिळवले. मध्यंतराला मुंबईने १४-१३ अशी एक गुणाची निसटती आघाडी घेतली होती.

मध्यंतरानंतर राजस्थानच्या सौरभ गाडगेने १.१५ मि.पेक्षा जास्त संरक्षण केले. निलेश पाटील पाटीलने रन्सचा एक गुण मिळवून दिला, तर दुसरी तुकडी सव्वा मिनिटात बाद झाली. मुंबईच्या पी. शिवा रेड्डीने व श्रीजेश एसने आक्रमणात प्रत्येकी चार गुण मिळवून दिले, तर शेवटच्या व चौथ्या टर्नमध्ये मुंबईची पहिली तुकडी सव्वा दोन मिनिटात बाद झाली. दुसरी तुकडीसुद्धा बाद झाल्याने सर्व दारोमदार तिसऱ्या तुकडीवर येऊन पडली व ती त्यांनी यशस्वी पाने पार पाडत ड्रीम रन्सचे तीन गुण मिळवत रोमहर्षक विजय साजरा केला. यात श्रीजेश एसने ड्रीम रन्सचे दोन गुण मिळवून दिले. शेवटच्या क्षणापर्यंत दोलायमान अवस्थेत असलेला हा सामना अखेर मुंबईने जिंकला. राजस्थानच्या निलेश पाटीलने सहा गुण मिळवले, तर दिलराजसिंग सेंगर चार गुण मिळवत कडवी लढत दिली. या सामन्यात निलेश पाटीलला उत्कृष्ट आक्रमक, सुशांत हजारेला उत्कृष्ट संरक्षक, तर श्रीजेश एसला अष्टपैलू खेळाडूचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

अन्य सामन्यात तेलुगू योद्धासचा ओडिशा जगरनॉट्सवर २९-२८ (मध्यंतर १४-१५) असा एक गुणाने निसटता विजय मिळवला. गतविजेत्या ओडिशाला मध्यंतराला मिळालेल्या एक गुणाची आघाडी कामी आली नाही. या सामन्यात प्रतिक वाईकरला उत्कृष्ट आक्रमक, आदित्य गणपुले उत्कृष्ट संरक्षक, तर दिपेश मोरेला अष्टपैलू खेळाडूचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

(छाया : महेंद्र खैरे)



# महिला कबड्डी स्पर्धेत किहीम संघ विजेता

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे श्री दत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित महिला कबड्डी स्पर्धेत भिल्लेश्वर किहीम संघाने विजेतेपद पटकाविले. व्दितीय क्रमांक वतिक्षा वावोशी, तृतीय सुवर्णगणेश दिवेआगर, चतुर्थ क्रमांक प्रतिज्ञा बांधण संघाने मिळविला.

प्रतिवर्षाप्रमाणे श्री स्वामी दत्तनाथ चैतन्यधाम ट्रस्ट (वाडगाव, कुरूळ, वेश्वी व बेलकडे) रसानी टेकडी श्री दत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने वाडगाव येथे पायथ्याशी नव्यानेच उभारलेल्या भव्य मैदानात जयेंद्र काशिनाथ भगत व मित्र मंडळ आणि वाडगाव ग्रामस्थ यांच्या विद्यमाने स्व. काशिनाथ मरबा भगत व स्व. बाळू शांताराम थळे स्मृतीचषक महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत किहीम, मांडवा, आवास, वाडगाव, दिवेआगर, वावोशी, कोलवे, व बांधण या संघांनी सहभाग घेतला होता. निरीक्षक म्हणून जनार्दन पाटील यांनी, तर अविनाश गोंधळी, जगदीश तुणतुणे, अभिजित पाटील, व निसेत मगर यांनी पंचाचे काम पाहिले.

उत्कष्ट खेळाडू धनश्री बेंद्रे (किहीम), चढाई वैष्णवी पाटील (वावोशी), पकड दुचा भगत (बांधण) यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



## नूतन मराठी विद्यालयात क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

एनसीआरडी संचालित नेरूळ येथील नूतन मराठी माध्यमिक विद्यालयात सन २०२३-२४मधील वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन कांस्यपदक विजेता आणि ठाणे जिल्हा कबड्डी संघाचा कर्णधार रोहन तुपारे याच्या हस्ते झाले.

उद्‌घाटन समारंभाला विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक नीलेश सैद, सुजाता मुंढे, लता औटे उपस्थित होते. या वेळी मुख्याध्यापक प्रदीप कांबळे यांनी रोहन तुपारे याचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुनील पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

वार्षिक क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, भालाफेक, गोळाफेक, १०० व २०० मीटर धावणे, कॅरम, बुद्धिबळ स्पर्धांचा समावेश होता.

# डेव्हिड वॉर्नर वनडेतूनही निवृत्त

**सिडनी : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा दिग्गज क्रिकेटपटू डेव्हिड वॉर्नरने नुकतीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. पाकिस्तानविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर तो कसोटी क्रिकेट खेळणार नाही. दरम्यान, वॉर्नरने क्रिकेटरसिकांना आणखी एक मोठा धक्का देत एकदिवसीय क्रिकेटमधूनही निवृत्ती घेत असल्याचे जाहीर केले आहे.

३७ वर्षीय वॉर्नरने यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली होती. त्यामुळे तो कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत असला तरी पुढची दोन-तीन वर्षे तो मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये खेळत राहील असा अंदाज वर्तवला जात होता, पण ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान यांच्यामध्ये चालू असलेल्या कसोटी मालिकेतील तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत वॉर्नरने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याचे जाहीर केले.

वॉर्नरने १६१ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामन्यांमध्ये ४५.३०च्या सरासरीने आणि ९७.२६च्या स्ट्राईक रेटने ६,९३२ धावा जमवल्या आहेत. यादरम्यान त्याने २२ शतके आणि ३३ अर्धशतके झळकावली आहे. वॉर्नरने जानेवारी २००९मध्ये होबार्ट येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्याद्वारे एकदिवसीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. एकदिवसीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वाधिक धावा जमवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत त्याचा सहावा क्रमांक आहे.



### ...तर संघासाठी उपलब्ध असेन!

*पत्रकार परिषदेत डेव्हिड वॉर्नर म्हणाला, मला माझी पत्नी कँडिस आणि तिन्ही मुली, आयव्ही, इसला आणि इंडीला अधिक वेळ द्यायचा आहे. दरम्यान, वॉर्नरने सांगितले की, मला कल्पना आहे की, पुढच्या वर्षी चॅम्पियन्स ट्रॉफीसारखी महत्त्वाची स्पर्धा खेळवली जाणार आहे. तोवर मी असाच (चांगल्या फॉर्ममध्ये) खेळत राहिलो आणि त्यांना (ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाला) माजी गरज असेल, तर मी संघासाठी उपलब्ध असेन.*



## सिमरन शिंदेने शालेय कॅरम स्पर्धा जिंकली

**मुंबई : प्रतिनिधी**

कॅरमप्रेमी स्व. प्रल्हाद नलावडे स्मृती चषक विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धा मराठा हायस्कूल वरळीच्या सिमरन शिंदेने जिंकली. अंतिम सामन्यात सिमरनने ईझाक न्यूटन ग्लोबल स्कूल वसईचा श्रीशान पालवणकरचा १९-१ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

चेंबूर पश्चिम येथील श्री नारायण गुरु कॉलेज ऑफ कॉमर्स-स्पोर्ट्स जिमखान्यामध्ये झालेल्या शालेय कॅरम स्पर्धेत मुंबईसह ठाणे, पुणे, पालघर जिल्ह्यातील ६४ शालेय खेळाडूंनी भाग घेतला होता.

स्पर्धेतील उपांत्य उपविजेतेपद ध्रुव भालेराव-अँटोनियो डासिल्व्हा हायस्कूल व वेदांत राणे-युनिव्हर्सल हायस्कूल; उपांत्यपूर्व उपविजेतेपद पुष्कर गोळे-पोदार अकॅडमी, नैतिक लाडे-जीएमपीएस, नेहाल उस्मानी-पोदार अकॅडमी, आयुष गरुड-आर्यन वर्ल्ड स्कूल पुणे; तर उपउपांत्यपूर्व उपविजेतेपद ध्रुव शाह-पोदार अकॅडमी, निखील भोसले-मायकल हायस्कूल, समीर खान-बीए विद्यालय, सार्थक केरकर-पार्ले टिळक विद्यालय, प्रसन्ना गोळे-पोदार अकॅडमी, कृष्णा खेमकर-एनइएस हायस्कूल, गौरांग मांजरेकर-पाटकर विद्यालय, प्रसाद माने-पाटकर विद्यालय यांनी मिळविले.

विजेत्या, उपविजेत्यांना पुरस्कार देऊन श्री नारायण गुरु कॉलेजचे जनरल सेक्रेटरी ओ.के. प्रसाद, स्पोर्ट्स डायरेक्टर पूनम मुजावर, अविनाश स्पोर्ट्सचे प्रमुख अविनाश नलावडे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळीनी गौरविले. प्रमुख पंचाचे कामकाज कॅरमपटू चंद्रकांत करंगुटकर व क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक यांनी पाहिले.

# सत्याग्रह हायस्कूल येथे क्रीडा महोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राहुल शिक्षण प्रसारक मंडळ संचलित खारघर येथील सिद्धार्थ विद्यालयात रायगड जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांचा क्रीडा महोत्सव सलग तीन दिवस विविध खेळांच्या स्पर्धा घेऊन उत्साहात झाला. त्यास प्रतिसाद लाभला.

संस्थेच्या डॉ. नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळा, (नागोठणे), सिद्धार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, सत्याग्रह ज्युनिअर. कॉलेज, सत्याग्रह महाविद्यालय, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय मिळून पाच हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी विविध खेळांच्या स्पर्धेत भाग घेतला.





एम्पायर अशोका चेम्बर्स ऑफ ग्रीकल्चर ॲण्ड कॉमर्सचे कार्याध्यक्ष प्रवीण मोरे यांच्या हस्ते या ३३व्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी संस्थेच्या जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर खेळात भाग घेतलेल्य विद्यार्थ्यांचा मोरे यांनी गौरव केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ अत्यावश्यक आहेत. या संस्थेच्या विद्यार्थ्यांमध्ये खेळासाठी प्रचंड ऊर्जा असून स्पर्धेत जिंकण्याचा संगर हा विद्यार्थ्यांना नेतृत्व गुण, समुह एकता, शारिरीक सक्षमता आणि ध्येय गाठण्यासाठीची एकाग्रता निर्माण करते, असे त्यांनी सांगितले.

क्रीडा महोत्सवात धावणे, कबड्डी, क्रिकेट, खो-खो, उंच उडी, लांब उडी, टग, अपवार, गोळाफेक, भालाफेक अशा विविध स्पर्धा अंर्तवर्ग व आंतरशालेय स्पर्धा घेऊन विजेत्यांना प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी रोजी गौरविण्यात येणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी सांगितले.

क्रीडा महोत्सव यशस्वी होण्यासाठी प्रा.वनिता सुर्यवंशी, सुजाता भोसले, प्रमिला सणस, ललिता यशवंते, आशा शिंदे यांनी मेहनत घेतली, असे क्रीडा संचालक प्रा. एम.एल. सूर्यवंशी सांगितले.

## आंतरशालेय खो-खो, लंगडी, कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

दादर येथील अमर हिंद मंडळ मंडळाने आंतरशालेय खो-खो, लंगडी, कबड्डी स्पर्धा २ ते ५ जानेवारी या कालावधीत मंडळच्या मैदानात आयोजित केली आहे. या स्पर्धेत खो-खोचे कुमार/मुली गटात एकूण २४ शाळा, कबड्डीत २६ शाळा, तर लंगडीत १८ शाळाचे संघ सहभागी होणार आहेत.

खो-खो स्पर्धेचे उद्‌घाटन आयकर अधिकारी प्रशांत सामंत तसेच बक्षीस समारंभ पहिल्या माजी राष्ट्रीय खो-खो खेळाडू विजया लाड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

लंगडीच्या उद्‌घाटनासाठी अमर हिंद मंडळाचा अष्टपैलू खेळाडू निरव पाटील आणि बक्षीस समारंभास साई इलेक्ट्रिकल्सचे मालक आदित्य गंधेकर उपस्थित राहणार आहेत.

कबड्डी स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी वेस्टर्न रेल्वे सहाय्यक प्रशिक्षक वर्षा भोसले आणि बक्षीस समारंभासाठी वेस्टर्न रेल्वे प्रशिक्षक धर्मवीर चिल्लर व महिलांसाठी रेल्वे प्रशिक्षक हरजित मलकितसिंग संधू उपस्थित राहणार आहेत.






# नवीन वर्षात टीम इंडियाचे व्यस्त वेळापत्रक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघासाठी २०२३ हे वर्ष चढ-उतारांनी भरलेले होते. दोन वेळा टीम इंडिया आयसीसी ट्रॉफी जिंकण्याच्या जवळ आली, पण अंतिम सामन्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. असे असतानाही भारताने सर्वोत्कृष्ट संघ म्हणून विश्वचषकावर वर्चस्व राखले. आता भारताला २०२४ ध्येही चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करावा लागणार आहे. यंदा टी-२० विश्वचषक जिंकून भारतीय संघ दशकभराचा आयसीसी ट्रॉफीचा दुष्काळ संपवण्याचा प्रयत्न करणार आहे.



यंदा भारताला इंग्लंड, श्रीलंका, बांगलादेश, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या संघांबरोबर खेळायचे आहे. बीसीसीआयने वर्षभराचे पूर्ण वेळापत्रक जाहीर केले नाही, परंतु भारतीय खेळाडूंचे जूनपर्यंतचे वेळापत्रक स्पष्ट झाले आहे. यानंतर भारताला २०२५मध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आयसीसी कसोटी चॅम्पियनशिपसाठी द्विपक्षीय मालिका खेळायची आहे.

२०२४मध्ये भारताचा पहिला सामना दक्षिण आफ्रिकेबरोबर होणार आहे. भारतीय संघ दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर आहे. टी-२० आणि एकदिवसीय मालिकेनंतर येथे कसोटी मालिका खेळवली जात आहे. भारत या दौऱ्यातील शेवटचा सामना २०२४मध्ये ३ जानेवारीपासून खेळणार आहे. हा सामना ७ जानेवारीला संपणार आहे.

११ जानेवारीपासून टीम इंडियाला अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळायची आहे. दोन्ही संघांमधील ही पहिली द्विपक्षीय मालिका असेल. दोन्ही देशांदरम्यान जरी कसोटी सामना झाला असला तरी मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये हे दोन्ही संघ फक्त आयसीसी आणि आशिया चषक स्पर्धांमध्येच खेळले आहेत.

यंदा भारतीय संघाला इंग्लंडबरोबर पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळायची आहे. ही मालिका २५ जानेवारीपासून सुरू होऊन ११ मार्चला संपणार आहे. सुमारे दोन महिने चालणारी ही मालिका जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या दृष्टिकोनातून दोन्ही संघांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

### एप्रिल-मेमध्ये आयपीएल स्पर्धा

इंग्लंडविरुद्धच्या दीर्घ कसोटी मालिकेनंतर सर्व खेळाडू काही दिवस विश्रांती घेणार आहेत. त्यानंतर आयपीएल सुरु होईल. दोन महिने चालणाऱ्या या स्पर्धेत झटपट क्रिकेटचा थरार शिखरावर असेल.

### जूनमध्ये टी-२० विश्वचषक विजेतेपद

टी-२० विश्वचषक २०२४ वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत ४ ते ३० जूनदरम्यान होणार आहे. आयपीएलनंतर सर्व संघांच्या बहुतेक खेळाडूंना टी-२० क्रिकेटची सवय होईल आणि विश्वचषकाचा उत्साह शिगेला असेल.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com